# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**मंगळवार, दिनांक ०६ मार्च, २०१८ / फाल्गुन १५, १९३९ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **गृहनिर्माण मंत्री** | |
| **(३)** | **कामगार, कौशल्य विकास, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४६**

---

### नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी देण्यात आलेल्या भूखंडावर हस्तांतरण शुल्क लागू केल्याबाबत

**(१) * १०९२८३ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या भूखंडावर अवाजवी हस्तांतरण शुल्क लागू केल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासकाला देण्यात येणाऱ्या या शुल्काचा भरणा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना करावा लागत असल्याने त्यांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्पग्रस्तांना विकसित भूखंड देण्याचे मान्य करून देखील सिडकोने अवाजवी पायाभूत सोयी विकासदर लावल्याने प्रकल्पग्रस्तांना भूखंड विकसित करणे अशक्य झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने हस्तांतरण शुल्क आणि पायाभूत सोयी विकासदर रद्द करावा अशी मागणी प्रकल्पग्रस्तांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नवी मुंबई जमीन विनीयोग (नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प व तद्संबंधित वापर अन्वये बाधित प्रकल्पग्रस्तांसाठी भूखंड वाटप) (सुधारित) विनियम, २०१५ नुसार प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्यात आलेला भूखंड त्यांनी अन्य विकासकास हस्तांतरीत केल्यास उक्त विकासकाकडून हस्तांतरण शुल्क, पायाभूत सुविधा विकास शुल्क इत्यादी शुल्क आकारले जाते. मात्र प्रकल्पग्रस्तांनी स्वत: भूखंड विकसीत केल्यास त्यांना शुल्क माफ करण्यांत आले आहे. त्यामुळे प्रकल्पबाधितांचे नुकसान होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) हे खरे नाही.

प्रकल्पग्रस्तांनी स्वत: भूखंड विकसीत केल्यास पायाभूत सोयी विकास दर लागू नाही.
(४) व (५) प्रकल्पग्रस्तांनी स्वत: भूखंड विकसीत केल्यास पायाभूत सुविधा विकास शुल्क तसेच हस्तांतरण शुल्क आकारण्यांत येत नसल्याने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील भायखळा येथील राणीबागेच्या विकासासाठी आरक्षित ठेवण्यात आलेल्या जागेचा ताबा खाजगी विकासकाने घेतल्याबाबत

**(२) * १०४९६६ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी),**

**प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भायखळा येथील राणीबागेच्या विकासासाठी आरक्षित ठेवण्यात आलेल्या जागेचा ताबा खाजगी विकासकाने घेतल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भायखळा येथील प्लॉट न. ५९३ वरील १४ एकर जमिनीपैकी ७ एकर जमीन राणीबागेच्या विकासासाठी तर उर्वरित ७ एकर जमीन गिरणी कामगारांसाठी घरे बांधण्याकरिता आरक्षित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राणीबागेच्या विकासासाठी आरक्षित असणाऱ्या ७ एकर जमिनीचा विकास न करता विकासकाच्या ताब्यात देण्याची नेमकी कारणे काय आहेत,

(४) असल्यास, संबंधित विकासकाने महानगरपालिकेकडे टीडीआर किंवा रुपये ६० कोटींची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर १४ एकर जागेचे संपूर्ण आरक्षण व विकासासंदर्भात व विकासकाच्या ताब्यात असणारी ७ एकर जमीन महानगरपालिकेकडे परत घेण्याकरिता शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ते (३) अशी बाब नाही.

शासन नगरविकास विभागाकडील 'ई' वॉर्डच्या मंजूर विकास आराखडयामध्ये दिनांक १०.२.२००४ रोजीच्या अधिसूचनेन्वये भूकर क्र.५९३ क्षेत्र धारण करणाऱ्या जमिनीवरील वीर जिजामाता भोसले उद्यान आणि प्राणिसंग्रहालयाचा विस्तार या आरक्षणामध्ये फेरबदल मंजूर झालेला आहे. त्यानुसार निव्वळ आरक्षित क्षेत्राच्या ५० टक्के २७२८४.३६ चौ.मी. जमीन उद्यान विस्तारासाठी आरक्षित ठेवलेली असून उर्वरित ५० टक्के क्षेत्र हे धारण उपक्रम (Retention Activity) म्हणून नामनिर्देशित केलेले आहे.

सदर जमीन राज्य शासनाची असून ती मे.मफतलाल इंडस्ट्रिज यांचेकडे भाडे करारावर होती. शासनाच्या महसूल विभागाकडून उद्यान विस्तारासाठी आरक्षित असलेल्या क्षेत्राचा ताबा दिनांक ७.१.२०१७ रोजी महानगरपालिकेस देणेत आलेला आहे.

(४) मे. मफतलाल इंडस्ट्रिज यांनी हस्तांतरणाच्या कार्यवाहीस आक्षेप घेवून यासंदर्भाने मा.उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका क्र.२९८२/२०१६ दाखल केलेली आहे. तसेच महानगरपालिकेकडे वास्तुविशारद यांचेमार्फत हस्तांतरणीय विकास हक्क (टिडीआर) मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सध्या प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(५) व (६) विकास योजनेमध्ये उद्यान विस्तारासाठी आरक्षित असलेल्या क्षेत्राचा ताबा महानगरपालिकेने घेतलेला आहे. सबब त्याव्यतिरिक्त विकासकाकडे ताब्यात असलेले क्षेत्र परत घेण्याची बाब उद्भवत नाही.

-----------------

## दादर (मुंबई) येथील छाप्रा व मोहसीन इमारतीच्या पुनर्विकासात नागरिकांची झालेली फसवणूक

**(३) * ११०११९ श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर (मुंबई) आर. के. वैद्य मार्ग येथील छाप्रा व मोहसीन इमारतीच्या पुनर्विकासासाठी विकासक मे. शुभ इंटरप्रायजेस यांना सन २००८ मध्ये वि. नि. नि. ३३(७) अंतर्गत ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले होते परंतू सदर पुनर्विकासाचे काम ४ ते ५ वर्षापासून अर्धवट स्थितीत असून रहिवाश्यांनी याबाबत शासनाकडे तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासकाकडून भाडेकरू / रहिवाश्यांना पर्यायी जागेसाठी भाडे देऊन इमारत रिकामी करून घेण्यात आली होती, परंतु मागील ४ वर्षापासून विकासकाने पर्यायी जागेसाठी देण्यात येणारे भाडेही देणे बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, तद्नुसार पुनर्विकासाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) दादर-पश्चिम येथील प्लाझा सिनेमा समोरील छाप्रा व मोहसिन इमारतींचे पुनर्विकासाचे काम विकासकांने अर्धवट अवस्थेत सोडलेले आहे, हि वस्तुस्थिती आहे.

याबाबत भाडेकरु / रहिवाशी व विकासक यांची संयुक्त बैठक मुख्य अधिकारी / दुवपु मंडळ यांनी दि.२३.०५.२०१६ रोजी मा.आमदार श्री.सदा सरवणकर यांच्या उपस्थितीत पार पाडली. त्यावेळी विकासकाचे प्रतिनिधी यांनी असे सांगितले की, निधी अभावी त्यांचे काम बंद आहे व लवकरच उपाययोजना करुन काम सुरु करण्यात येईल.

म्हाडाने अशाच प्रकारच्या बंद पडलेल्या पुनर्विकास प्रकल्पासाठी व धोरण निश्चित करण्यासाठी दि.०२.११.२०१६ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला असून प्रस्तावामध्ये ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करुन म्हाडाने मालमत्ता म्हाड अधिनियम १९७६ प्रकरण ५ कलम ४१ मधील तरतूदीनुसार भूसंपादित करुन, उर्वरित काम पूर्ण करण्याची तरतूद केलेली आहे. सदरचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिपळूण (जि.रत्नागिरी) येथे ईडू अर्न कन्सल्टन्सी या कंपनीने हजारो लोकांची केलेली फसवणूक

**(४) * ११३३६५ श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) येथे ईडू अर्न कन्सल्टन्सी या कंपनीने जाहिरातीद्वारे घरबसल्या पैसे कमाविण्याची स्कीम बाजारात आणून येथील हजारो लोकांची सुमारे ५० कोटी रुपयांची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीच्या चिपळूण येथील कार्यालयावर छापा टाकून श्री.रविकिरण बटू नामक व्यवस्थापकाला अटक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार लोकांची फसवणूक करणाऱ्या संबधीत कंपनीविरोधात कारवाई करण्याबाबत तसेच सदर गुंतवणूक करणाऱ्या लोकांना त्यांची रक्कम मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) चिपळूण (जि.रत्नागिरी) येथे ईडू अर्न कन्सल्टन्सी या कंपनीने जाहीराती द्वारे घर बसल्या पैसे कमविण्याची स्कीम बाजारात आणून दिनांक १३.२.२०१८ रोजी पर्यंत या कंपनीने १९ लोकांची एकूण रूपये २४,०२,७४९/- इतक्या रक्कमेची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच सदर कंपनीचे कार्यालय सील करून कंपनीचा प्रोप्रायटर श्री.रविकिरण लक्ष्मीपती बटुला यास दिनांक ११.१.२०१८ रोजी अटक करण्यात आली आहे.

(३) सदर प्रकरणी एका आरोपीविरूद्ध चिपळूण पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ११/२०१८, भा.दं.वि.सं. कलम ४०६,४०९,४२०,४६५,४६८,४७१, माहीती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(ड) सह द प्राईज चिटस ॲण्ड मनी सर्क्युलेशन स्किम्स (बॅनिंग) ॲक्ट १९७८ चे कलम ४,५ प्रमाणे दाखल करून त्या आरोपीस अटक करण्यात आली असून गुन्हा तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अहमदनगर महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात तरतूद नसतानाही बनावट सह्या करुन केलेला गैरव्यवहार

**(५) * १०६८५० श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात तरतूद नसतानाही कामे केल्याचे दाखवून व अधिकाऱ्यांच्या बनावट सह्या करुन पथदिव्यांच्या कामांची सुमारे ४० लाख रुपयांची बनावट देयके ठेकेदार व काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने काढून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करण्यात आल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानूसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अहमदनगर महानगरपालिकेच्या विद्युत विभागामार्फत करण्यात आलेल्या कामांसाठी अंदाजपत्रकात केलेल्या तरतुदीतून देयके अदा करण्यात आली आहेत. तथापि, या कामांमध्ये गैरव्यवहार झाला असल्याचे महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या प्राथमिक चौकशीत स्पष्ट झाले आहे.

(२) या प्रकरणी महानगरपालिकेमार्फत प्राथमिक चौकशी करण्यात आली असून, चौकशीत अधिकारी/ कर्मचारी व ठेकेदार दोषी आढळून आले आहेत.

या प्रकरणातील संबंधित प्रभारी उपायुक्त यांना शासनस्तरावरुन निलंबित करण्यात आले असून, त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

महानगरपालिकेचे मुख्य लेखाधिकारी यांच्याविरुध्द वित्त विभागामार्फत कारवाई करण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणाशी संबंधित, महानगरपालिकेचे ०२ अधिकारी व ०१ कर्मचारी यांना महानगरपालिकेमार्फत निलंबित करण्यात आले असून, त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

संबंधित ठेकेदारास काळ्या यादीत टाकणे व त्याची नोंदणी रद्द करणेबाबत महानगरपालिकेमार्फत कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

या प्रकरणातील महानगरपालिकेच्या संबंधित अधिकारी/कर्मचारी व ठेकेदार यांचेविरुध्द महानगरपालिकेमार्फत फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर (जि.सोलापूर) शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या उजनी जलवाहिनीला जोड देवून पाणीपुरवठा करण्यात येत असल्याबाबत

**(६) * १११४८६ कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर (जि.सोलापूर) शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या उजनी जलवाहिनीला ७ ठिकाणी जोड देवून त्या ठिकाणावरुन इतर ठिकाणी पाणी पुरवठा करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जलवाहिनीतील पाणी कमी होत असल्याने त्याचा परिणाम वितरण व्यवस्थेवर होत असून जुळे सोलापूर, आदित्यनगर,विडी घरकूल परिसरातील पाण्याच्या टाकीत पाणी पोहचत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, थेट जलवाहिनेतून पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेत जोड देणे हा दखलपात्र गुन्हा आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अशा प्रकारचे जोड देणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सन १९९२ मध्ये महानगरपालिकेच्या हद्दीत वाढ झाल्याने नव्याने समाविष्ट झालेल्या गावांना पाणीपुरवठा करण्यासाठी सन १९९८ नंतर ७ ठिकाणी मुख्य जलवाहिनीला जोड देण्यात आले आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

(२) • सोलापूर शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी उजनी जलाशयातून ११० कि.मी. ची मुख्य जलवाहिनी टाकून त्याद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो.

• जुळे सोलापूर, आदित्यनगर, विडी घरकुल ही गांवे या मुख्य जलवाहिनीच्या शेवटच्या टोकाला असून हद्दवाढीमुळे नव्याने समाविष्ट झालेली गांवे या भागाच्या वरील बाजूस आहेत.

• जोड देऊन या गावांना पाणीपुरवठा केल्याने जुळे सोलापूर, आदित्यनगर, विडी घरकुल या परिसराला पूर्वीइतक्या पूर्ण दाबाने पाणी मिळत नाही व तेथील पाण्याचे जलकुंभ पूर्णपणे भरण्यास विलंब होतो, ही वस्तुस्थिती आहे.

(३) ज्या शासकीय यंत्रणेची जलवाहिनी आहे, त्या यंत्रणेच्या परवानगीशिवाय जोड देणे, हा गुन्हा ठरतो. याप्रकरणी सदर मुख्यवाहिनी ही सोलापूर महानगरपालिकेच्याच मालकीची असून सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मंजूरीने, हद्दवाढीमुळे नव्याने समविष्ट झालेल्या गावातील नागरिकांना पाणीपुरवठा करण्याच्या हेतूने हे जोड दिले गेले आहेत.

(४) व (५) • कार्यवाहीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

• मात्र हद्दवाढ झाल्याने समाविष्ट झालेल्या गावात सध्या मुख्य जलवाहिनी, उपजलवाहिनी अशा जलवाहिन्यांद्वारे पाणीपुरवठा होतो.

• सोलापूर शहरातील वितरण व्यवस्था बळकटीकरणासाठी अमृत अभियानातून मंजूर पाणीपुरवठा प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.

• त्यामधून, या भागात जलकुंभ बांधणीचे काम प्रगतीपथावर आहे. हे जलकुंभ बांधून पूर्ण झाल्यावर पाण्याचे योग्य नियोजन करुन जुळे सोलापूर, आदित्यनगर, विडी घरकुल या परिसराला अधिक दाबाने पाणीपुरवठा करणे शक्य होणार आहे.

• तसेच, सोलापूर शहराच्या पाणीपुरवठ्याचा स्त्रोत अधिक सक्षम करण्यासाठी उजनी धरणावरून अतिरिक्त पाईपलाईन टाकण्याचा प्रकल्प प्रस्तावित आहे.

-----------------

## कळवा (जि.ठाणे) येथील खाडी शेजारील सर्व्हे क्र.४२५ या जागेचा गैरवापर केल्याबाबत

**(७) * १०५५५३ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवा (जि.ठाणे) येथील सर्व्हे क्र.४२५ या खाडी शेजारील जागेचा ७/१२ शासनाच्या नावावर असून, सध्या ही जागा मेरिटाईम बोर्डाच्या ताब्यात असतानाही या जागेत अनेक प्रकारची बेकायदेशीर बांधकामे करण्यात आल्याबद्दल मनोहर सुगदरे या सामाजिक कार्यकर्त्याने पुराव्यांसह लेखी तक्रार जिल्हाधिकारी, तहसिलदार, आयुक्त, महानगरपालिका यांचेकडे दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तहसिलदार अधिक पाटील यांच्या आदेशाने सर्कल अधिकारी जाधव व तलाठी शेडगे यांनी प्राप्त तक्रारीनुसार केलेल्या पंचनाम्यामध्ये शासनाच्या जागेवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण सुरु असून तसा अहवाल तहसिलदार व सर्कल अधिकारी यांनी महानगरपालिका व जिल्हाधिकारी यांना पाठविल्याने या सर्व भूमाफियांवर तिवरांची कत्तल करुन मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर बांधकाम केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची मागणी मनोहर सुगदरे यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडे केलेल्या तक्रारीत नमूद केलेल्या प्रमुख बाबी कोणत्या तसेच तहसिलदार व सर्कल अधिकारी यांनी शासनास सादर केलेल्या अहवालामध्ये पंचनाम्यात आढळलेल्या कोणत्या बेकायदेशीर गोष्टींचा उल्लेख केलेला आहे,

(४) असल्यास, तक्रारदाराने केलेल्या तक्रारी व त्यानुषंगाने शासनास प्राप्त झालेल्या अहवालानुसार बेकायदेशीर बांधकामाविरोधात तसेच ते करणाऱ्या भूमाफियांना सहकार्य करणाऱ्या मेरिटाईम बोर्डाच्या संबंधीत अधिकाऱ्यांविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

सर्व्हे क्रमांक ४२५ मधील खाडी शेजारील जागा ही ७/१२ उताऱ्यावर महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या नावावर नाही. तथापि सदर जागा अंतर्गत जल वाहतूकीचा निर्णय लागेपर्यंत कुणासही देता येणार नाही अशी नोंद आहे.

(२) होय.

(३) १) सोमनाथ चाळ व गाळे तसेच इतर अनधिकृत बांधकाम त्वरीत कार्यवाही करुन पाडण्यात यावी.

२) तिवरांच्या झाडांची कत्तल व भरणी ताबडतोब थांबवून संबंधित व्यक्तीवर गुन्हे दाखल करावेत.

(४) विषयांकीत जागेत कांदळवनाचे नुकसान करुन सपाटीकरण केल्याप्रकरणी श्री.हक्काराम चेनाजी सोहल व इतर १ यांच्याविरुध्द पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ च्या कलम १५ १९ अन्वये स्थानिक पोलीस स्टेशन कळवा येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक II-१/१८, दिनांक ०९.०१.२०१८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

श्री.सुखदरे यांचे अर्जात बोर्डाच्या अधिकाऱ्यांबाबत तक्रार नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धामणे (ता.खेड, जि.पुणे) या गावातील युवतीचा खून केल्याबाबत

**(८) * ११०९९६ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणे (ता.खेड, जि.पुणे) या गावातील कु.कोमल शांताराम कोळेकर या १७ वर्षीय बेपत्ता युवतीच्या डोक्यात दगड घालून निर्वस्र करून तिचा खून केल्याची घटना दिनांक ४ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अल्पवयीन युवतीच्या खुनाबाबत दोन महिने उलटूनही स्थानिक पोलिसांना गुन्हेगारांचा शोध लागला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हत्येमधील गुन्हेगारांना विनाविलंब शोधून त्याच्यांवर भा.द.वि. कलमानुसार कारवाई करण्यासाठी सक्षम अधिकाऱ्यामार्फत विशेष तपासणी मोहिम राबवावी याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या अनुषंगाने हत्येतील गुन्हेगारांना शोधून त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) फिर्यादीने दिलेल्या तक्रारी नुसार गुन्ह्याच्या तपासासाठी लागणा-या सर्व उपाययोजना करून अज्ञात गुन्हेगारास शोधण्याचे काम पोलीसा मार्फत सुरू आहे.

(३) होय.

(४) फिर्यादिने दिलेल्या अज्ञात आरोपीबाबत चाकण पोलीस स्टेशन येथे गु र नं १२१८/२०१७ भादवि कलम ३६३ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात येऊन ३०२,२०१ भा द वि व बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंध अधिनियम कलम ४, ६ प्रमाणे वाढीव कलम लावण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) शहरातील नगर परीषद प्राथमिक शाळेतील शिक्षिकेचा केलेला खून

**(९) * १०६४९१ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) शहरातील नगर परीषद प्राथमिक शाळेतील शिक्षिका सुलभा सरोदे हिचा गळा चिरून तिच्या पतीने खून केल्याची घटना दिनांक १० डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार शिक्षिकेच्या पतीला अटक करून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) फिर्यादीने दिलेल्या तक्रारी नुसार सिंदखेडराजा पोलीस स्टेशन येथे अ प क्र २२९/२०१७ कलम ३०२, ३२४, ४५२, ४४९, ४५०, ४९८ (अ) भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करून संबंधित आरोपीस अटक करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे आरोपी विरूध्द मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले असून सद्यस्थितीत गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परळी वैजनाथ (जि.बीड) येथील वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्यात स्फोट होऊन सात कामगारांचा झालेला मृत्यु

**(१०) * १०६१८६ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परळी वैजनाथ (जि.बीड) येथील वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्यात उसाच्या रसाच्या टाकीचा स्फोट होऊन सात कामगारांचा मृत्यु झाल्याची घटना माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर टाकीची देखभाल व्यवस्थापनाने केलेली नसल्याने व सदर टाकीची तपासणी प्राधिकृत सक्षम व्यक्तींकडून करण्यात न आल्याने सदर घटना घडली आहे, तसेच सदर कारखान्याचे सन २०१६ पासून निरीक्षणही झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषी व्यवस्थापनावर, संचालक मंडळावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना लि., पांगरी, ता. परळी वैजनाथ, जि. बीड या कारखान्यात दि. ०८/१२/२०१७ रोजी अंदाजे दुपारी ३.०० वा. इव्हॅपोरेटर बॉडी क्रं. १ चे वाफ गळती दुरूस्तीचे काम झाल्यानंतर सदरील बॉडीचे बॉटम प्लेटचे वेल्डींग अचानक निघून बॉटम प्लेट जमिनीवर पडल्यामुळे व यातील गरम उसाच्या रसामुळे सात कामगारांचा मृत्यू झाला हे खरे आहे.
(२) सदर इव्हॅपोरेटर बॉडी क्रं. १ ही प्रेशर व्हेसल नसल्याने प्राधिकृत सक्षम व्यक्तीकडून तपासणी करून घेण्याची तरतूद नियमामध्ये नाही. तरी सुद्धा कारखाना व्यवस्थापनाकडून इव्हॅपोरेटर बॉडी क्रं. १ ची Ultrasonic testing ही प्राधिकृत सक्षम व्यक्तीकडून दि. ०३/१२/२०१७ रोजी करण्यात आली होती. तसेच व्यवस्थापनाने दि. ०७/११/२०१७ रोजी सदर इव्हॅपोरेटर बॉडीच्या कॅलेंड्रियाचे हायड्रॉलिक टेस्टींग ४५ Lbs प्रेशरवर केलेली होती व ०८/११/२०१७ रोजी सदर इव्हॅपोरेटर बॉडीच्या वरील मॅनहोलपर्यंत बॉडी पाण्याने भरून Leak टेस्ट घेतली होती. सदर टाकीचे बॉटम प्लेटचे वेल्डींग हे Corrosion, erosion मुळे तसेच २००७ पासून ही बॉडी वापरात असल्याने कमकुवत झाल्याने तुटले व त्यामुळे ही घटना घडली.

संचालनालयामध्ये कारखाने निरीक्षणासाठी CIA (Centralized Inspection Agency) पदधत चालु असल्याने, त्याअंतर्गत कारखान्याचे नाव वाटप झाल्यासच अधिका-यास निरीक्षण करता येते. दिनांक २५/०७/२०१६ रोजी CIA अंतर्गत या कारखान्याचे नाव निरीक्षणासाठी आले होते. परंतु त्यावेळी गळीताचा हंगाम नसल्याने कारखाना बंद होता व त्यामुळे निरीक्षण करता आले नाही.
(३) सदर प्रकरणी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, औरंगाबाद मार्फत चौकशी करण्यात आली. चौकशीत असे आढळून आले की, सदर इव्हॅपोरेटर बॉडीचे बॉटम प्लेटचे वेल्डींग हे Corrosion, erosion मुळे तसेच २००७ पासून बॉडी वापरात असल्याने कमकुवत झाल्याने तुटले.

याबाबत कारखान्याचे भोगवटादार श्री.नामदेवराव आघाव यांचेवर कारखाने अधिनियम १९४८ चे कलम ७-अ(२)(अ) च्या भंगाबाबत मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, बीड यांचे न्यायालयात (खटला क्रं. २५६४/२०१७) दाखल करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला शहरातील शासनाच्या मालकीचा भूखंड बळकाविण्याचा केलेला प्रयत्न

**(११) * १०५८७५ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरातील शिट क्र.३७-बी, प्लॉट नं.१२१/१ व १ अ हे भूखंड शासनाच्या मालकीचे असताना या भूखंडांच्या कागदपत्रात तालुका भूमीअभिलेख विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संगनमताने गजराज गुदडमल मारवाडी यांच्या नावे ऑनलाईन नोंद घेऊन रुपये २० कोटींपेक्षा अधिक किंमतीचा भूखंड बळकाविण्याचा प्रयत्न करणाऱ्या भूमीअभिलेख विभागाचे संचालक बी.डी.काळे व अन्य तीन कर्मचारी तसेच भूमीअभिलेख विभागाचे जिल्हा अधीक्षक अजय कुलकर्णी व उपअधीक्षक योगेश कुलकर्णी इ. कर्मचारी व अधिकाऱ्यांविरुध्द आर्थिक गुन्हे शाखा, अकोला यांचेकडे लेखी तक्रार नोंदविण्यात आल्याची बाब दिनांक १८ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण झाला आहे काय,

(३) असल्यास, तपासाचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार शासनाच्या भूमीअभिलेख तसेच अन्य विभागातील दोषी कर्मचारी/अधिकाऱ्यांबरोबर बाहेरील व्यक्तींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) अकोला भूमिअभिलेख कार्यालयातील अभिलेखामध्ये शिट नं. ३७ बी, प्लॉट नं. १२१/ पैकी क्षेत्रफळ ३७१७.१७ चौरस मीटरची हस्तलिखीत आखीव पत्रिका नसताना अज्ञात इसम व त्यांचे कार्यालयातील अज्ञात कर्मचारी यांनी उपअधीक्षक भूमिअभिलेख कार्यालयातील संगणकामध्ये वरील मालमत्तेची गजराज गुददमल मारवाडी यांच्या नावाने बनावट मालमत्ता- पत्रक तयार केली अशी उपअधीक्षक, भूमिअभिलेख यांनी केलेल्या तक्रारीवरून सदर प्रकरणी २ आरोपी व भूमीअभिलेख अकोला कार्यालयातील अज्ञात कर्मचारी व अज्ञात इसमाविरोधात सिटी कोतवाली, पोलीस स्टेशन अकोला येथे अप.क्र. २२०/१७ कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब) भादंवि सह कलम ६५ आय.टी. ॲक्ट २००० अन्वये गुन्हा दाखल करून सदर गुन्हा पुढील तपासासाठी आर्थिक गुन्हे शाखेकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे. गुन्हा तपासावर आहे.

बनावट मालमत्ता पत्रकावरील नाव असलेल्या व्यक्तीचा मुलगा व नातू यांना अटक केली आहे. उपअधीक्षक, भूमीअभिलेख कार्यालयातील ३ संगणकाच्या हार्ड डिस्क जप्त करून तपासणी कामी न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळा धंतोली, नागपूर येथे पाठविण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौ.तिर्लोट (मोहूळवाडी) (ता.देवगड, जि.सिंधुदूर्ग) येथील जुन्या जेट्टीच्या दुरुस्तीकरीता दिलेल्या निधीचा गैरवापर झाल्याबाबत

**(१२) * १०८३५१ श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ. तिर्लोट (मोहूळवाडी) (ता.देवगड, जि.सिंधुदूर्ग) येथील जुन्या जेट्टीची दुरुस्ती करणेबाबत पतन अभियंता, सिंधूदूर्ग पतन विभाग, कुडाळ यांनी त्यांच्या दिनांक २८ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या पत्रान्वये रुपये २०.६९ लक्ष इतक्या खर्चाच्या बांधकामास प्रशासकीय मंजूरी दिलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम न करता संबंधित ठेकेदार व सरपंचांची खोटी सही करुन तसे कागदपत्र सहायक पतन अभियंता देवगड उपविभाग, सिंधुदूर्ग यांना सादर करुन त्या कामाऐवजी सदरचा निधी तिर्लोट आंबेरी येथे फीश प्लँट व रॅम्प तयार करुन निवारा शेड बांधण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करुन संबंधितांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही, तिर्लोट मोहुळवाडी (आंबेरी) येथील जेट्टीची दुरुस्ती करणे (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) कामाला जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, सिंधुदुर्ग यांचे पत्र दि.१५.१२.२०१५ अन्वये रु.२०.६९ लक्ष इतक्या रक्कमेस प्रशासकीय मंजूरी दिली असून पत्तन अभियंता, सिंधुदुर्ग पत्तन विभाग कुडाळ यांचे पत्र दि.२८.१०.२०१५ अन्वये रु.२०.६९ लक्ष इतक्या रक्कमेस तांत्रिक मान्यता दिली आहे.
(२) हे खरे नाही, तिर्लोट मोहुळवाडी (आंबेरी) येथील जेट्टीची दुरुस्ती करणे या कामास जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, सिंधुदुर्ग यांनी स्वतंत्र मान्यता दिली असून, सदर प्रशासकीय मान्यतेनुसार काम भौतिकदृष्टया पूर्ण करण्यात आले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दौंड (ता.दौंड, जि.पुणे) येथील माहिती अधिकार कार्यकर्त्याने आत्महत्या केल्याबाबत

**(१३) * ११३३२० श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (ता.दौंड, जि.पुणे) येथे काही लोकांच्या त्रासाला कंटाळून निसार शेख या माहिती अधिकार कार्यकर्त्याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना दिनांक १ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आत्महत्या करण्यापूर्वी निसार शेख यांनी स्वतःचा एक व्हिडीओ देखील सोशल मिडीयावर टाकल्याचे उघड झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मशीद व मदरसा याची माहिती मागवल्याने याच परिसरातील ११ लोकांनी वारंवार त्रास देत असल्याची तक्रार आत्महत्या करणाऱ्या निसार शेख यांनी यापूर्वी देखील पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण व पोलीस निरीक्षक दौंड पोलीस स्टेशन यांचेकडे करून देखील त्यांना कोणतीही मदत झाली नसल्याचा उल्लेख सदर व्हिडीओ मध्ये केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) अर्जदार निसार शेख यांचा अर्ज पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्या कार्यालयात दि.३०.८.२०१७ रोजी प्राप्त झाला आहे. तसेच त्या अर्जाची एक प्रत दौंड पोलीस स्टेशन येथे प्राप्त झाली आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने धर्मादाय आयुक्त, पुणे यांच्याकडून अहवाल मागविला आहे. तसेच सदर अर्जातील गैरअर्जदार यांचेवर दि.१५.१२.२०१७ रोजी सी.आर.पी.सी. १०७ प्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे

(४) सदर घटनेबाबत ११ आरोपीविरुध्द दौंड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ८०/२०१८ भा.द.वि. कलम ३०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील सर्व आरोपींना मा.न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाड (जि.रायगड) येथील कारखान्यामध्ये प्रतिबंधात्मक पदार्थाची कामगारांकडून विक्री केली जात असल्याबाबत

**(१४) * ११२०१० श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) येथील एका मान्यताप्राप्त कारखान्यामध्ये अंमली पदार्थविरोधी पथकाने घातलेल्या धाडीमध्ये इपीड्रीन या पदार्थापासून निर्माण होणाऱ्या प्रतिबंधात्मक पदार्थाची कारखान्यातील कामगारांकडून विक्री करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाड औद्योगिक वसाहतीमधील गत ७ वर्षामध्ये रायरीसवर केमिकल, रोहन केमिकल या दोन कंपन्यामधील करण्यात येणाऱ्या उत्पादनादरम्यान अंमली पदार्थविरोधी पथकाकडून रासायनिक पदार्थाची निर्मिती व विक्री बेकायदेशीरपणे केल्याबाबत सदर कंपनींवर कारवाई करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा प्रकारे बेकायदेशीर विक्री करणा-या सदर कंपन्यासोबत अन्य कंपन्याची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हो हे खरे आहे. तथापि सदरील कारवाई पोलीस ठाणे महाड यांनी केली नसून केंद्र शासनाच्या नारकोटीक्स कंट्रोल ब्युरो यांनी केली आहे. त्यांनी सदरील गुन्हा रजि. नं. ०१/२०१८ एनडीपीएस ॲक्ट कलम १९८५ नुसार दाखल केला आहे.

(२), (३) व (४) होय सदरील दोन्ही प्रकरणी केंद्र शासनाच्या नारकोटीक्स कंट्रोल ब्युरोने अनुक्रमे सन २०१० व सन २०११ मध्ये कारवाई केली असून सध्या दोन्ही प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## पुणे महानगरपालिकेच्या रूग्णालायांमध्ये कालबाह्य झालेली औषधे रूग्णांना देण्यात आल्याबाबत

**(१५) * ११३१९५ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरामध्ये डेंग्यूच्या साथीने अनेक रूग्ण आजारी असताना महानगरपालिकेच्या रूग्णालायांमध्ये माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान कालबाह्य औषधे रूग्णांना देण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे महानगरपालिकेच्या प्रभारी आरोग्य अधिकारी यांनी महानगरपालिका रूग्णालायांना कालबाह्य औषधे देणाऱ्या व औषधे पुरविणाऱ्या ठेकेदारांवर कोणतीही कारवाई केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे महानगरपालिकेत नियमित आरोग्य अधिकारी व रिक्त असलेली डॉक्टरांची व कर्मचाऱ्यांची पदे अद्यापही भरलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) पुणे महानगरपालिकेच्या डॉ.राजीव गांधी रूग्णालयातील कुटूंब कल्याण विभागामार्फत वाटप करण्यात येणाऱ्या लोहयुक्त गोळ्या मुदतबाह्य असल्याचे आढळून आले हे खरे आहे.

अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांनी स्व.राजीव गांधी रूग्णालय येथे सदर घटनेच्या अनुषंगाने दि.१४.११.२०१७ रोजी भेट दिली होती.

मुदतबाह्य झालेल्या लोहयुक्त गोळ्यांच्या स्ट्रीप्सचा स्वतंत्रपणे साठा करण्यात आला होता. त्यामुळे सदरच्या गोळ्यांचे वाटप करण्यात आलेले नव्हते.

सदर रूग्णालयातील संबंधीत कर्मचाऱ्यांची चौकशी करण्यात आलेली असून मुदतबाह्य झालेल्या गोळ्यांचे वाटप करण्यात आलेले नसल्यामुळे त्यांच्या विरूध्द कारवाई करण्यात आलेली नाही.

(३) व (४) आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## "पद्मावत" चित्रपटाच्या चित्रीकरणाचे शासनाला देय असलेले शुल्क भन्साळी प्रोडक्शन्सकडून वसूल करणेबाबत

**(१६) * ११२३६३ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा येथील मसाई पठार येथे भन्साळी प्रोडक्शन्सने "पद्मावत (आधीचे नाव 'पद्मावती')" या चित्रपटाचे २० दिवस चित्रीकरण केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या चित्रीकरणासाठी नियमानुसार शासनाला देय असलेल्या एकूण १ लाख ९१ हजार ४५८ रुपयांच्या शुल्कापैकी १ लाख ६२ हजार ७४२ रुपयांचे शुल्क या चित्रपटाच्या निर्मात्याने भरले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलीस, वन विभाग आणि जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी चित्रीकरणासाठी अनुमती देण्यापूर्वी संबधित व्यक्ती आणि संस्था यांच्याकडून चित्रीकरणासाठी अनुमती घेण्याची अट घातली असतानाही अट पाळण्यात आली नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून शासनाचा महसूल बुडविणाऱ्या आणि शासनाच्या अटींचे पालन न करता शासनाची फसवणूक करणाऱ्या संबधित प्रोडक्शनवर कारवाई करून उर्वरित शुल्क वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली (जि.सांगली) शहरात दुषित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असल्याबाबत

**(१७) * ११०२७४ श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली (जि.सांगली) शहरातील रामनगर, गावभाग, पाटणे प्लॉट, गवळी गल्ली, खणभाग आदि गावात व शहराच्या पश्चिम परिसरात बऱ्याच दिवसापासून गांडुळ व अळयामिश्रित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असल्याने नागरिकांना मोठया प्रमाणात दूषित पाण्यापासून विविध रोगाची लागण झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शहरातील नागरिकांना स्वच्छ, शुध्द व पुरेसे पाणी मिळावे याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) केंद्र शासन पुरस्कृत UIDSSMT योजनेंतर्गत टाकण्यात आलेल्या पाईपलाईनच्या कामाची चाचणी करीत असतांना सांगली शहरातील वखारभाग येथील त्रिमुर्ती थियटरजवळ सदर पाईपलाईनच्या जॉईंटमध्ये असलेल्या कपलिंगमधील रबरी गॅस्केट खराब झाल्यामुळे बाहेरील गटारीचे पाणी या पाईपलाईनमध्ये गेल्याने शहरातील काही भागात दिनांक १५/११/२०१७ रोजी दुषित पाण्याचा पुरवठा झाला, हे खरे आहे.

• तथापि, या कालावधीत दुषित पाण्यामुळे कोणत्याही जलजन्य आजाराचा प्रादुर्भाव शहरात झाला नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) पाईपलाईन चाचणीचे काम सुरु करण्यापूर्वी पिण्याच्या पाण्यासंबंधी आवश्यक दक्षता घेण्याबाबत महानगरपालिकेकडून प्रसारमाध्यमांद्वारे नागरिकांना जाहीर आवाहन करण्यात आले होते.

• दुषित पाणीपुरवठा होत असल्याबाबत नागरिकांच्या तक्रारीवरुन सदर चाचणीचे काम ताबडतोब थांबविण्यात आले.

• तद्नंतर सदर पाईपलाईनची दुरुस्ती करण्यात येऊन सद्यस्थितीत अस्तित्वातील पाईपलाईनद्वारे नागरिकांना स्वच्छ व शुध्द पाणीपुरवठा महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मालाड (मालवणी) येथे म्हाडाने पोलीसांच्या घरासाठी दिलेल्या भूखंडावर बांधलेली घरे अन्य व्यक्तींना विकल्याबाबत

**(१८) * १०५०२३ श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालाड (मालवणी) येथील दादासाहेब गायकवाड नगर येथे म्हाडाने पोलीसांच्या घरासाठी दिलेल्या भूखंडावर बांधलेली घरे विकासक संस्थेने (पोलीस हौऊसिंग सोसायटीने) अन्य व्यक्तींना विक्री केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, म्हाडाला देय असलेली घरे रोखून ठेवली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) उपाध्यक्ष, म्हाडा यांचेकडून प्राप्त अहवालानुसार, पोलिस हौसिंग फेडरेशन सोसायटीने १.२ हेक्टर क्षेत्रावर बांधलेली घरे खुल्या बाजारात विक्री केलेली आहे.

(२) व (३) पोलिस हौसिंग फेडरेशनकडून म्हाडाला २२३ घरे देय आहेत. तथापि, सदर देय असलेल्या सदनिकांच्या बांधकामाच्या त्रुटीमुळे त्याचा म्हाडाने ताबा घेतलेला नाही. तसेच सदरहू बाब पोलिस हौसिंग फेडरेशनला म्हाडाने कळविलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईतील सिडको हद्दीतील भूखंडाचा ताबा बेकायदा वाहनतळ चालविणाऱ्यांनी घेतला असल्याबाबत

**(१९) * १०६२२३ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील सिडको हद्दीतील पनवेल, खांदा कॉलनी, कामोठा, कळंबोली, रोडपाली विभागातील वसाहतीतील सिडकोच्या ताब्यात असलेल्या मोकळया भूखंडाचा ताबा बेकायदा वाहनतळ चालविणा-यांनी घेतला असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेकायदेशीररित्या वाहनतळ चालविणाऱ्यांनी सिडकोच्या ताब्यात असलेल्या भूखंडावर गॅरेज, खानावळ, पंक्चर वाल्यांना जागा भाडयाने दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिडको प्रशासनाला कोणताही मोबदला न देता सदर भूखंड बेकायदेशीररित्या भाडयाने देऊन शासनाची लाखो रूपयांची फसवणूक केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून शासनाची लाखो रूपयांची फसवणूक करणाऱ्या व बेकायदेशीररित्या व्यवसाय करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) नवी मुंबई सिडको हद्दीतील पनवेल, खांदा कॉलनी, कामोठा, कळंबोली, रोडपाली विभागातील वसाहतीतील सिडकोच्या ताब्यात असलेले मोकळे भूखंड सिडकोने कोणालाही भाडेतत्त्वावर दिलेले नाहीत. तथापि, मोकळ्या भूखंडावरील अनधिकृत वाहनतळ निष्कासीत करण्याबाबत सिडकोमार्फत वेळोवेळी कारवाई करण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डहाणू (जि.ठाणे) नगरपरिषदेत कचरा डेपोच्या जागा वाटपात कोट्यवधी रुपयांचा झालेला गैरव्यवहार

**(२०) * ११०१२१ श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू (जि.ठाणे) नगरपरिषदेत कचरा डेपोच्या जागा वाटपात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जागा जाहिरात निविदेनुसार घेण्याच्या आदेशांच्या नियमांचे उल्लंघन करुन तत्कालिन मुख्याधिकारी, नगराध्यक्ष व नगरसेवक यांनी संगनमताने जागा खरेदी केल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) तथापि, डहाणू नगरपरिषदेकडे घनकचरा व्यवस्थापनासाठी स्वत:ची जमीन अथवा शासकीय जमीन उपलब्ध नसल्याने जमीन खरेदीसाठी दिनांक ०४/१०/२००२ रोजीच्या स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरात देऊन नगरपरिषदेकडून निविदा मागविण्यात आल्या.

• प्राप्त झालेल्या ४ निविदेतून न्युनतम निविदा स्विकृत करुन नगरपरिषदेच्या विशेष सर्वसाधारण सभेच्या दि. २३/१०/२००२ रोजीच्या ठरावानुसार २.१८ हे. इतकी जमीन नगरपरिषदेने खरेदी केली आहे.

• संपूर्ण निविदा व खरेदी प्रक्रिया शासनाच्या प्रचलित धोरणानुसार नगरपरिषदेमार्फत पूर्ण करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी येथील जे.एस.डब्ल्यू कंपनीच्या उर्जा प्रकल्पामुळे मच्छीमारांच्या रोजगारावर झालेला परिणाम

**(२१) * ११३३९४ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी येथील जे.एस.डब्ल्यू कंपनीच्या उर्जा प्रकल्पासाठी समुद्रात भराव टाकून जेट्टी बांधण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जेट्टीच्या कामामुळे जयगड व परिसरातील मच्छीमारांच्या रोजगारावर मोठ्या प्रमाणात परिणाम झाला असून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याविरोधात मच्छीमार ग्रामस्थांनी दिनांक २६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी येथे आंदोलन करून मागण्यांचे निवेदन शासनाला सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मच्छीमारांच्या मागण्या कोणत्या आहेत व सदर मागण्यांवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व तद्‌नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) होय.

(४) जेएसडब्ल्यू कंपनीच्या बंदर प्रकल्पामुळे मच्छिमारी व्यवसायावर परिणाम होत असून, कंपनीकडून नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मच्छिमारांची मागणी आहे. बंदर प्रकल्पामुळे मच्छिमारीवर होणारे परिणाम व त्यानुषंगाने द्यावयाची नुकसान भरपाई याबाबतचा अभ्यास करण्याचे काम जेएसडब्ल्यू जयगड पोर्ट लि. यांनी केंद्र शासनाच्या कृषि मंत्रालयाच्या अधिपत्याखालील सेंट्रल मरीन फिशरीज् रिसर्च इन्स्टिटयूट (CMFRI) या संस्थेकडे सोपविले आहे. हे काम एप्रिल-२०१८ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. CMFRI यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर नुकसान भरपाई संदर्भात पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पंढरपूर (जि.सोलापूर) येथे शेतकऱ्यांना आठवडी बाजार भरविण्याकरिता जागा उपलब्ध करून देण्याबाबत

**(२२) * १०९७५९ श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथे शेतकऱ्यांसाठी थेट ग्राहकांना आपला कृषिमाल विकावा व त्यासाठी आठवडी बाजार भरविण्यासाठी शहरात जागा उपलब्ध करून देण्याचे आदेश शासनाने नगरपालिका प्रशासन यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंढरपूर या तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी अद्यापही स्थानिक नगरपालिका प्रशासन यांनी शेतकऱ्यांच्या बाजार पेठेला जागा उपलब्ध करून दिली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) शासनाने दि.२४.०८.२०१६ व दि.११.०८.२०१७ च्या शासन परिपत्रकान्वये शेतकऱ्यांना त्यांचा कृषिमाल थेट विकता यावा यासाठी

महानगरपालिका/नगरपालिका यांच्या क्षेत्रात दर शनिवारी/रविवारी मैदान उपलब्ध करुन द्यावे, असे सर्व महानगरपालिका/ नगरपालिकांना निर्देश दिले आहेत. हे निर्देश पंढरपूर नगरपरिषदेलादेखील लागू आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

या संदर्भात पंढरपूर शहरात खालीलप्रमाणे व्यवस्था आहे :-

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ यांनी संत शिरोमणी श्री सावता माळी शेतकरी आठवडी बाजार भरविण्यासाठी मोकळी जागा कृषि पणन मंडळास उपलब्ध करुन देण्याची दि.३०.१०.२०१७ रोजीच्या पत्रान्वये नगरपरिषदेस विनंती केली होती. त्यास अनुसरुन नगरपरिषद, पंढरपूर यांनी सर्वसाधारण सभा ठराव क्र.७०, दि.१३.११.२०१७ अन्वये पंढरपूर नगरपरिषदेच्या मालकीची शहरातील गाताडे प्लॉटमधील शेळके वस्तीनजीक आरक्षण क्र.१०४ मार्केट व शॉपिंग सेंटर याठिकाणी भाजी मंडईची जागा दर शनिवारी आठवडी बाजार भरविण्यासाठी उपलब्ध करुन देण्यास मान्यता दिली आहे.

याव्यतिरिक्त शेतकऱ्यांना आपला कृषि माल थेट ग्राहकांना विकता यावा याकरिता दर मंगळवारी नगरपरिषदेच्या नवीपेठ बाजार आवारात शेतकरी आठवडी बाजार भरतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील एजंट व गुंतवणूकदारांची ओम साई प्रोडक्ट सेल या कंपनीच्या मालकाने केलेली फसवणूक

**(२३) * १०८५७५ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.भुपेंद्र चंद्रकांत मालवणकर यांनी ओम साई प्रोडक्ट सेल या कंपनीची स्थापना करून त्यांनी अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) लोकांकडून वेगवेगळ्या वर्षासाठी रिकरींग ठेवी व फिक्स डिपॉझीट मध्ये रक्कम गुंतविल्यास मोठ्या प्रमाणात टक्केवारी देण्याचे आमिष दाखवून तसेच एजंट लोकांना देखिल वेगवेगळ्या स्वरूपात कमिशन देण्यात येईल असे आमिष

दाखवून अलिबाग तालुक्यातील ४,३४० गुंतवणूकदारांकडून रूपये ४,७०,४९,२६३/- गोळा करून या सर्व गुंतवणूकदारांची व एजंटची फसवणूक केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.भुपेंद्र चंद्रकांत मालवणकर यांनी स्थापन केलेल्या ओम साई प्रोडक्ट सेल कंपनीमधील एजंट हे स्थानिक रहिवासी असून त्यामध्ये बहुतांशी महिला एंजट असून सदरच्या एजंटकडून कोणत्याही रक्कमेची अफरातफर करण्याचा व फसविण्याचा कोणताही हेतू नव्हता तर रोजगार मिळावा या उद्देशाने ते काम करीत होते, हे ही खरे आहे काय,

(३) सदर प्रकरणी ओम साई प्रोडेक्ट सेल कंपनीचे मालक श्री.भुपेंद्र चंद्रकांत मालवणकर यांनी केलेल्या सदर फसवणूक प्रकरणी अलिबाग पो.स्टे.१७०/२०१७ अन्वये तक्रार नोंद केलेली असून त्यांची संपत्तीही जप्त करण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच गुंतवणूकदारांचे पैसे परत मिळण्याबाबत व सदर एजंटना संरक्षण, न्याय मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१), (२), (३) व (४) ओम साई प्रोडक्ट सेल या कंपनीचे मालक श्री.भुपेंद्र चंदकांत मालवणकर व अन्य एकाविरूद्ध अलिबाग पो.स्टे. कॉ.गु.रजि.नंबर १७०/२०१७, भादंवि कलम ४२०, ४०६,४०९, ३४, व महा. ठेविदारांचे हितसंरक्षण अधिनिमय १९९९ चे कलम २(ड) प्रमाणे गुन्हा दाखल केला असून दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून सदर गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखा, रायगड-अलिबाग हे करीत आहेत. सदर प्रकरणी आरोपीची संपत्ती जप्त करण्याबाबत महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ अन्वये कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहराला समान पाणीपुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेने काढलेल्या साठवण टाक्यांची निविदा प्रक्रिया अडचणीत आल्याबाबत

**(२४) * १०५८९२ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराला समान पाणीपुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेने काढलेल्या साठवण टाक्यांची निविदा प्रक्रिया अडचणीत आली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेकडून समान पाणीपुरवठा योजनेंतर्गत अडीचशे कोटी रुपये खर्चून ८२ नव्या साठवण टाक्या उभारण्यात येणार असून त्यासाठी राबविण्यात आलेली निविदा प्रक्रिया एका ठराविक कंपनीच्या फायद्यासाठी अनुकूल करण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अनेक जागा महानगरपालिकेच्या ताब्यात नसताना टाक्या उभरण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी मा.मुख्यमंत्री यांनी नगरविकास विभागाच्या सचिवांना सूचना केल्या असून त्या संदर्भात सचिवांकडून चौकशी करून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) • पुणे शहरातील समान पाणीपुरवठा योजनेतील पाण्याच्या टाक्या बांधण्याच्या कामाचे कार्यादेश दि.२३.९.२०१६ रोजी देण्यात आले आहेत.

• सदर कामासाठी प्राप्त निविदांमधील सर्वात कमी दराच्या निविदादारास कार्यादेश देण्यात आले आहेत.

• याप्रकरणी सन २०१६ च्या हिवाळी अधिवेशनात झालेल्या चर्चेवरील आश्वासनास अनुसरून सदर कामास दि.१५.३.२०१७ च्या शासन पत्रान्वये स्थगिती देण्यात आली होती.

• तसेच यासंदर्भात चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत पुणे महानगरपालिकेस आदेश देण्यात आले होते.

• योजनेचे व्यापक स्वरूप लक्षात घेऊन सदर स्थगिती दि.५.५.२०१७ च्या शासन पत्रान्वये उठविण्यात आलेली आहे.

(३) सदर प्रकरणी बहुतांशी जागा ताब्यात आलेल्या असून तेथे टाक्यांची बांधकामे करण्यात येत आहेत. तथापि, काही जागा तांत्रिक अडचणींमुळे ताब्यात आलेल्या नाहीत. तेथे टाक्यांचे बांधकाम करणे शक्य झालेले नाही. ज्या जागांचा ताबा अद्याप प्राप्त झालेला नाही अशा जागा ४ आठवडयामध्ये ताब्यात घेण्याबाबत पुणे महानगरपालिकेस सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रस्तुत प्रकरणाची सखोल चौकशी करून त्याचा अहवाल शासनास सादर करण्याबाबत दि.६.५.२०१७ च्या शासन पत्रान्वये विभागीय आयुक्त, पुणे यांना आदेश दिले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई, सिंधुदुर्ग जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात 'पॅनकार्ड क्लब्स' लिमिटेड कंपनीने गुंतवणूकदरांना फसविल्याबाबत

**(२५) * १०५३७८ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, सिंधुदुर्ग जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात 'पॅनकार्ड क्लब्स' लिमिटेड कंपनीने सन १९९७ ते २०१४ या कालावधीत सुमारे ५० लाख गुंतवणूकदारांना रुपये ७ हजार ३५ कोटीहून अधिक रक्कमेस फसविले असल्याचे आर्थिक गुन्हे विभागाच्या तपासात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू संस्थेच्या संचालकांनी संबंधित योजना राबविताना सेबीकडून कोणतीही मंजुरी घेतली नसल्याचेही उघड झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कंपनीची संपत्ती विकून गुंतवणूकदारांचे पैसे फेडण्यासाठी सेबीने निवृत्त न्यायामुर्ती आर.एम. लोढा यांची नियुक्ती केली असुन प्रस्तूत चौकशीत काय आढळून आले आहे,

(४) असल्यास, ग्राहकांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी, राज्य शासनाने सदरहू कंपनीच्या संचालकाविरुध्द, फौजदारी व दिवाणी दावे दाखल करुन, कंपनीची मालमत्ता जप्त करुन, ग्राहकांना परतावा रक्कम देण्याची मागणी, लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांना, दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) मे. पॅनकार्ड क्लब ही कंपनी सेबीकडे रजिस्टर्ड नसल्याने कंपनीने नवीन गुंतवणूक स्विकारु नये, नवीन स्कीम सुरु करु नये, कंपनीच्या मालमत्तेबाबत संपूर्ण माहिती सेबीकडे सादर करणे व मालमत्तेची विल्हेवाट लावू नये तसेच, कंपनीने गुंतवणूकदारांकडून जमा केलेला निधी, गुंतवणूकदारांची यादी, गुंतवणूकीचा तपशिल, कंपनीसाठी काम करणारे एजन्ट व त्यांना देण्यात आलेले कमिशन याबाबत सेबीने आदेश दिलेले आहेत. तसेच, कंपनीने त्यांच्या सर्व योजना बंद करुन ५१ लाख गुंतवणूकदारांचे ७०३५ कोटी रुपये तीन महिन्याच्या आत परत करण्याचे व नवीन गुंतवणूक स्विकारण्यास प्रतिबंध करुन मालमत्तेची विल्हेवाट न लावण्याबाबत तसेच, सिक्युरिटी मार्केट मध्ये व्यवहार न करण्याबाबत आदेश दिलेले आहेत.

पॅनकार्ड कंपनीने याबाबत सिक्युरिटी अपिलेट ट्रिब्युनल कडे केलेले अपिल फेटाळले आहे. तसेच, कंपनीच्या ३४ स्थावर मालमत्ता सेबीने जप्त केल्या असून सदर मालमत्तांची लिलाव प्रक्रिया सेबीमार्फत सुरु आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) सदरहु कंपनीने केलेल्या फसवणुकीबाबत राज्यात पुढीलप्रमाणे ६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

१. सावंतवाडी पोलीस ठाणे, सिंधुदुर्ग येथे गु.र.क्र. १२८/१६, भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, ३४ सह एमपीआयडी कायदा १९९९ चे कलम ३ व ४(१) प्रमाणे गुन्हा नोंद.

२. राजापेठ पोलीस ठाणे, अमरावती शहर येथे गु.र.क्र. ७८९/१६, भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४०६, ४०९, १२० (ब) सह एमपीआयडी कायदा १९९९ चे कलम ३ प्रमाणे गुन्हा नोंद.

३. वाई पोलीस ठाणे, सातारा येथे गु.र.क्र. १३७/१७, भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद.

४. पंचवटी पोलीस ठाणे, नाशिक शहर येथे गु.र.क्र. ३३४/१७, भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ४०९, १२०(ब), ३४ सह कंपनी कायदा १९५६ चे कलम ३६, ३७, ७४, ४४७ सह एमपीआयडी कायदा १९९९ चे कलम ३ व ४ प्रमाणे गुन्हा नोंद.

५. पनवेल पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे गु.र.क्र. ३३८/१७, भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ४०९, ३४ सह एमपीआयडी कायदा १९९९ चे कलम ३ व ४ प्रमाणे गुन्हा नोंद.

६. आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई येथे गु.र.क्र. ९८/१७, भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, ३४ सह एमपीआयडी कायदा १९९९ चे कलम ३ व ४ प्रमाणे गुन्हा नोंद.

उपरोक्त नमूद पैकी एक गुन्हा न्यायप्रविष्ठ असून इतर ५ गुन्हे तपासाधीन आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे नगररचना योजनेतील पेठ पर्वती येथील जागा मूळ मालकांना अनियमितपणे परत करण्यात येत असल्याबाबत

**(२६) * १०४८८७ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे नगररचना योजनेतील सन १९६६ मध्ये महानगरपालिकेने ताब्यात घेतलेली पेठ पर्वती येथील सर्व्हे नं.१२ अ, १२० ब येथील २७ एकर २८ गुंठे जागा मूळ मालकांना अनियमितपणे परत करण्यात येत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भातील ठराव १८३१ दिनांक १६ जानेवारी, २०१८ रोजी मंजूर झाला असून या निर्णयामुळे पुणे महानगरपालिकेचे मोठे आर्थिक नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तदनुसार या प्रकरणी काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, पुणे महानगरपालिकेच्या सभासद यांचे दि.१६/०१/२०१८ चे पत्र व स्थायी समिती ठ.क्र.१८३१ दि.१६/०१/२०१८ ला अनुसरुन नगररचना योजना क्र.३ अंतर्गत महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या फा.प्लॉट नं.५४५ च्या मोबदल्यापोटी प्लॉट क्र.१, १३, २४, ३७ व ४० या महानगरपालिकेकडे शिल्लक असलेले ५ प्लॉटपैकी प्लॉट क्र.२४ वगळून उर्वरित ४ प्लॉटची मालकी देणेबाबत (क्षेत्र साधारणपणे २४३०९ चौ.मी.) विशेष बाब म्हणून राज्य शासनाच्या स्तरावर निर्णय व्हावा अशी विनंती करण्यास व प्रकरणी राज्य शासनाकडून प्राप्त होणाऱ्या आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेस मान्यता देण्यात येत असल्याचा ठराव पुणे महानगरपालिकेच्या मुख्य सभेने ठ.क्र.९८८, दि.२९/०१/२०१८ अन्वये केलेला आहे. सदर ठराव प्रशासनाने प्रस्तावित केलेला नाही.
(३) या प्रकरणात उपरोक्त मुद्दा क्र.१ व २ मध्ये नमूद नुसार महानगरपालिका स्तरावर कार्यवाही सुरु आहे. सदरचा प्रस्ताव शासनास अद्याप सादर झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## पुणे महानगरपालिकेच्या वतीने वृक्षगणनेचे कंत्राट मे.सार आयटी रिसोर्सेस कंपनीला देण्यात आल्याबाबत

**(२७) * ११३०९३ श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या वतीने शहरातील वृक्षांची नेमकी संख्या जाणून घेण्यासाठी माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान वृक्षगणनेचे कंत्राट मे.सार आयटी रिसोर्सेस कंपनीला देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील बेस मॅप उपलब्ध नसतानाही वृक्षगणना झाल्याचे दाखवून कोट्यवधी रुपयांची देयके संबंधित ठेकेदाराला देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, १ लाख वृक्षांची गणना झाल्यावर ३ तज्ञांच्या समितीकडून त्याची पडताळणी करणे बंधनकारक असतानाही सदर ठेकेदाराने २३ लक्ष वृक्षांची गणना पूर्ण केल्याचे दाखवत त्यातील १९ लाख वृक्षगणनेचे ४ कोटी २९ लाख रुपयांचे देयक संबंधित ठेकेदाराला अधिकारी, वृक्ष प्राधिकरण सदस्यांनी आर्थिक संगनमताने अदा केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित ठेकेदारास महानगरपालिकेच्या वृक्ष विभागाने तज्ञांच्या समितीकडून तपासणी न करताच कोट्यवधी रुपयांची देयके माहे सप्टेंबर, २०१६ पासून परस्पर अदा केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर वृक्षगणनेचे मे.सार आयटी रिसोर्सेस कंपनीला देण्यात आलेल्या करारावर स्थायी समितीच्या सदस्यांच्या ऐवजी पुणे महानगरपालिकेच्या वृक्ष विभागाच्या सदस्यांच्या सहीने नियमबाह्यरित्या मंजुरी दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, संबधित ठेकेदाराचे बिल अदा करूनही गणना झालेल्या वृक्षांची माहिती अद्यापही उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी आयुक्तांकडे केली असून त्यानूसार सदर गैरव्यवहार प्रकरणातील दोषींवर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) • सदर प्रकरणातील निविदांच्या अटी व शर्तींनुसार महानगरपालिकेने ठेकेदारास वृक्षगणनेकरीता बेस मॅप उपलब्ध करून देणे आवश्यक होते.

• पुणे महानगरपालिकेत बेस मॅप तयार करण्याची कार्यवाही सुरू होती.

• बेस मॅप उपलब्ध नसतांना वृक्षांची माहिती संकलित करून गणना करण्यासाठी महानगरपालिकेस कोणतीही तांत्रिक अडचण नसल्याने वृक्षगणनेचे प्रत्यक्ष कामकाज बेस मॅप शिवाय सुरू करण्यात आले ही वस्तुस्थिती आहे.

• ठेकेदाराने वृक्षगणनेच्या प्रत्यक्ष केलेल्या कामाची तज्ञ समितीने तपासणी केल्यानंतरच त्याला देयके अदा करण्यात आलेली आहेत.

(३) व (४) • सदर कामाच्या निविदेतील अटींनुसार १ लाख वृक्ष गणनेच्या टप्प्यावर तज्ञ समितीचा तपासणी अहवाल सादर झाल्यानंतर तसेच ठेकेदाराने देयक सादर केल्यानंतर त्याला देयक अदा करण्यात येते.

• आजतागायत २४ लक्ष ८ हजार ६३ वृक्षांची गणना केलेली असून निविदेतील अटींनुसार व तज्ञ समितीने तपासणी केल्यानंतर २१ टप्प्यांमध्ये एकूण २१,०५,७२८ इतक्या वृक्षांच्या गणनेचे रूपये ४,३०,२०,०१८/- इतक्या रकमेची बीले अदा करण्यात आली असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) व (६) सदर प्रकरणी मे.सार आयटी रिसोर्सेस प्रा.लि. यांच्याकडून वृक्षगणनेचे काम करून घेण्यास व करार करण्यास स्थायी समिती पुणे महानगरपालिका यांनी दि. २३.२.२०१६ च्या ठरावान्वये मान्यता दिलेली आहे, तसेच सदर करारनामा वृक्ष प्राधिकरण व स्थायी समिती सदस्य यांच्या स्वाक्षरीने मोहोरबंद करण्यात आलेला आहे.

ठेकेदाराने संकलित केलेल्या वृक्षगणनेच्या कामाच्या माहितीची प्रत महानगरपालिकेकडे सादर केलेली आहे.

तसेच सदर कंपनीने संकेतस्थळावर वृक्षगणनेची माहिती प्रसिध्द केलेली असून उर्वरित वृक्षगणनेचे कामकाज सुरू आहे.

(७) या प्रकरणी वृक्षगणनेच्या कामाची चौकशी करण्यासाठी वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्यांनी आयुक्त, पुणे महानगरपालिका यांच्याकडे फेब्रुवारी, २०१८ मध्ये लेखी मागणी केलेली आहे.

सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत पुणे महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.

-----------------

## मुंबई उपनगरातील खासगी जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाबाबत

**(२८) * १०५०४१ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पश्चिम व पूर्व उपनगरातील ५० हजारांहून अधिक मोडकळीस आलेल्या खासगी जुन्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी कोणतेही धोरण नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने दिनांक २ सप्टेंबर, २०१६ रोजी जाहीर केलेल्या गृहनिर्माण धोरणानुसार मुंबई शहर व उपनगरातील बिगर उपकर धोकादायक असलेल्या भाडेकरूव्याप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करण्यासाठी बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील नवीन विनियम ३३ (७) (ए) अंतर्भूत करणेचा निर्णय घेतला असून यांसदर्भात नागरिकांच्या सुचना/हरकती मागविणारी सूचना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३३ (१एए) अन्वये दिनांक २ जानेवारी, २०१७ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तावित विकास आराखड्यात अशा ३० वर्षे जुन्या इमारतींना ४० टक्के प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्रफळ देऊनही ते पुरेसे नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या धोरणानुसार गृहनिर्माण संस्थांनी स्वयंविकास केला तरच ते शक्य असून विकासक नफा नसल्यामुळे या खासगी इमारतींच्या पुनर्विकासासाठी तयार होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आह काय,

(५) असल्यास, इमारतींची दुरुस्ती देखभाल आणि इमारतींचा पुनर्विकास, इमारतीतील समस्या जलदगतीने मार्गी लागाव्यात यासाठी शासनाने मुंबईतील आमदारांची समिती नियुक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, मुंबईतील बहुतांश खासगी इमारतींच्या पुनर्विकासासाठी योग्य धोरण आखण्याकरिता शासनाने काय उपाययोजना केली आहे व याबाबतच्या वैधानिक कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे तसेच यासंदर्भातील अंतिम अधिसूचना निर्गमित होण्यास किती कालावधी लागणार आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) मुंबई उपनगरातील धोकादायक भाडेकरु व्याप्त अधिकृत इमारती तसेच मुंबई बेट शहरामधील बिगर उपकरप्राप्त अधिकृत भाडेकरु व्याप्त धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासासंदर्भात विकास नियंत्रण नियमावलीमध्ये ज्याप्रमाणे उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांकाची तरतूद आहे त्याप्रमाणे तरतूद नसल्याने सदरची तरतूद करणेचा निर्णय घेण्यात आलेला होता.

यासंदर्भात धोकादायक भाडेकरुव्याप्त इमारतींसंदर्भात विकास नियंत्रण नियमावलीमधील नवीन नियम ३३ (७)(अे) अंतर्भूत करणारी प्रस्तावित फेरबदलाची नागरिकांच्या सुचना/हरकती मागविणारी सूचना दिनांक २ जानेवारी २०१७ रोजी प्रसिध्द केलेली होती. याबाबत वैधानिक कार्यवाही पूर्ण झालेली असून विकास नियंत्रण नियमावलीमधील मंजूर फेरबदलाची अंतिम अधिसूचना दिनांक ८ सप्टेंबर २०१७ रोजी निर्गमित करणेत आलेली आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून प्रारुप सुधारित विकास आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. महानगरपालिकेकडून सुधारित प्रारुप आराखडा प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीसह नागरिकांच्या सुचना/हरकतीसाठी प्रसिध्द केलेला होता. त्यामध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थाच्या ३० वर्षावरील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी कमाल ४० टक्के प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक प्रस्तावित केलेला होता.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेने नागरिकांच्या सूचना/हरकती विचारात घेवून वैधानिक कार्यवाही करुन प्रारुप सुधारित विकास आराखडा विकास नियंत्रण नियमावलीसह शासनास दिनांक २.८.२०१७ रोजी मंजूरीसाठी सादर केलेला आहे. त्यानुसार प्रसिध्द केलेल्या तरतूदीमध्ये महानगरपालिकेने बदल केलेले आहेत. त्यामध्ये प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांकासंदर्भातील ४० टक्के कमाल मर्यादा प्रस्तावित नाही.

(५) मुंबई शहर बेटावरील उपकरप्राप्त व बिगर उपकरप्राप्त इमारती व म्हाडाशी संबंधित इमारतीशी निगडीत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शासन गृहनिर्माण विभागाकडील दिनांक २९.१०.२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार (शुध्दीपत्रक दि.८/०३/२०१७) आमदारांची समिती नियुक्त आहे.

(६) व (७) बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक २.८.२०१७ रोजी सादर केलेल्या प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीस सर्व बाबींचा विचार करुन लवकरात लवकर गुणवत्तेनुसार अंतिम मंजूरी देणेचे शासनाकडून संकल्पित आहे.

-----------------

## रायगड मिलिटरी स्कूल व मे.इनव्हेंशन रियालेटर्स प्रा.लि. या संस्थेला वाटप केलेल्या भूखंडाचे अधिमूल्य म्हाडास भरले नसल्याबाबत

**(२९) * १०८५१०   डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड मिलिटरी स्कूल व मे.इनव्हेंशन रियालेटर्स प्रा.लि. या संस्थेला म्हाडाने (जमिनीचे वाटप) विनियम १९८२ च्या विनियम १६ अन्वये भाडेपट्टीवर वाटप केलेल्या एकूण १०,०३१ चौ.मी एवढया भूखंडाचे अधिमूल्य म्हाडास अद्यापपर्यंत भरलेले नसल्याने शासनाचे ५ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याची बाब माहे जानेवारी,२०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळेच्या भूखंडावर बांधण्यात येत असलेल्या इमारतीचा वापर व्यापारी प्रयोजनासाठी करावयाचा असल्यास म्हाडा, रायगड सैनिकी शाळा व मे.इनव्हेंशन रियालेटर्स प्रा.लि. यांचेमध्ये त्रिपक्षीय करार करणे अपेक्षित असतानासुध्दा म्हाडाकडून कोणतीही नोटीस पाठविण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शाळा व खेळाच्या मैदानाच्या आरक्षित जागेचा वापर इतर प्रयोजनासाठी करण्याकरिता शासनाची कोणतीच परवानगी घेतली नसल्यामुळे सदर प्रकरणी दोषी असलेल्या संस्थेला काळ्या यादीत टाकून सदर संस्थेकडून नियमबाहयरित्या जमिनीचा विकास व वापर केल्याप्रकरणी शासन संस्थेकडून भूखंड ताब्यात घेणार आहे काय,

(४) सदर प्रकरणी कायद्याचे उल्लंघन करुन संस्थेने शासनाची दिशाभूल केली व अधिमूल्यापोटी शासनाचे करोडो रुपयांचे नुकसान केलेले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) म्हाडाच्या अहवालानुसार, रायगड मिलिटरी स्कूल यांना म्हाडाने विनियम १६ अन्वये १०,२३१ चौ.मी.भूखंडाचे वाटप केले असून,

त्याचे पूर्ण अधिमूल्य न भरल्याने त्यांचेकडे उर्वरित अधिमूल्य व व्याज असे एकूण रु.५,९७,५१,३८३/-एवढे थकित आहेत.

(२) त्रिपक्षिय करारनामा अंमलात आणण्यासाठी म्हाडाने दि.२१.०१.२०१६ व दि.०५.१२.२०१७ च्या पत्राने संस्थेला कळविले आहे.

(३), (४) व (५) विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार आरक्षित जागेचा इतर प्रयोजनासाठी वापर करण्याची परवानगी म्हाडामार्फत देण्यात आली असून, संस्थेस नंतर वितरित केलेल्या ४०% क्षेत्राकरिता भूखंडाचे अधिमूल्य रक्कमेमध्ये ५०% सूट देण्याबाबतची संस्थेची विनंती प्रलंबित असल्यामुळे भूखंडाच्या उर्वरित अधिमूल्याची रक्कम व त्यावरील व्याज संस्थेकडे थकित आहे. त्यानुषंगाने संस्थेकडून थकबाकी वसूल करण्याबाबत म्हाडाकडून कार्यवाही सुरु आहे. तसेच संस्थेने रक्कमेचा भरणा न केल्यास संस्थेचे लेखा परिक्षण करुन प्रशासक नेमण्याचा प्रस्ताव उपनिबंधक, मुंबई मंडळ, म्हाडा किंवा धर्मादाय आयुक्त, मुंबई यांच्याकडे सादर करण्यात येईल.

त्याचप्रमाणे आर.आर.सी. च्या माध्यमातून संस्थेचे बँक खाते गोठवण्याची कार्यवाही करण्याचेदेखील प्रस्तावित आहे, असे म्हाडाने त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा (जि.बुलढाणा) शहरातील नाट्यगृहाचे काम निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(३०) * १११४६७ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा (जि.बुलढाणा) शहरातील गेल्या १२ ते १३ वर्षापासून बांधकाम सुरू असलेले नाट्यगृहाचे काम निधीअभावी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलढाणा शहरातील नाट्यगृहाचे काम त्वरित पूर्ण करण्याबाबत स्थानिक नाट्य रसिकांनी दिनांक २६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास मा.पालकमंत्री, बुलढाणा यांना दिलेले निवेदन शासनास प्राप्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,

(४) असल्यास, बुलढाणा शहरातील प्रलंबित नाट्यगृहाचे बांधकाम त्वरित करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) समाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभागाच्या दि.२७.०८.२००२ च्या शासन निर्णयान्वये जिल्हयांच्या मुख्यालयी बंदीस्त नाट्यगृह बांधण्याच्या योजनेअंतर्गत बुलढाणा येथील नाट्यगृहाच्या बांधकामासाठी रू.३,११,४४,३००/- एवढ्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

या योजनेच्या नियमानुसार एकूण आवश्यक निधीपैंकी ७५ टक्के निधी शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाने तर २५ टक्के निधी नगरपरिषदेने उपलब्ध करून द्यावयाचा होता. सांस्कृतिक कार्य विभागाने रू. २ कोटी एवढा निधी आतापर्यंत उपलब्ध करून दिला असून नगरपरिषदेने त्यांच्या हिश्याचा रू.७५ लाख एवढा निधी उपलब्ध करून दिला आहे.

(२) असे निवेदन मा. पालकमंत्री यांच्या कार्यालयास प्राप्त झाले असल्याचे आढळून आले नाही.

(३) • या प्रकरणी ऑगस्ट, २००७ मध्ये सांस्कृतिक कार्य विभागाकडून रू.१ कोटी एवढ्या निधीचा पहिला हफ्ता प्राप्त झाल्यावर नगरपरिषदेने मार्च, २००८ मध्ये या कामासाठीच्या निविदा मागविल्या.

• दि.२७.०३.२००८ च्या सर्वसाधारण सभेत प्राप्त झालेल्या निविदांवर विचार होऊन श्री.जे.व्ही. कुलकर्णी ॲन्ड फ्रेंड्स असोसिएट्स, मलकापूर या कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्याचा ठराव मंजूर होऊन त्यानुसार कार्यारंभ आदेश दि.२९.०३.२००८ रोजी देण्यात आला. सदर निविदा २०७.८५ लक्ष एवढ्या किंमतीची होती. कंत्राटदाराने १२ महिन्यात सदर काम पूर्ण करणे आवश्यक होते.

• नगरपरिषदेने दि.३१.१०.२०१६ पर्यंत वेळोवेळी कंत्राटदाराच्या विनंतीस अनुसरून काम पूर्ण करण्यास मुदतवाढ दिली. तथापि त्यानंतर मात्र मुदतवाढ न देता सदर कंत्राट रद्द करण्याचा निर्णय दि.१०.०३.२०१७ रोजीच्या

सर्वसाधारण सभेत घेण्यात आला. या सभेत राहिलेल्या उर्वरित कामाच्या रक्कमेच्या ५ टक्के एवढा दंड कंत्राटदाराकडून वसूल करण्याचाही निर्णय घेण्यात आला.

• कंत्राट रद्द करतानाच नगरपरिषदेने, प्रकल्प व्यवस्थापकाने सदर नाट्यगृह अत्याधुनिक होण्याच्या दृष्टिने सुचविलेल्या १२ अतिरिक्त कामाच्या बाबींनाही मंजुरी दिली आणि सुधारित प्रकल्प किंमतीनुसार शासनाकडे निधीची मागणी करण्याचाही निर्णय घेतला.

• नगरपरिषदेने रू.४.२३ कोटी एवढ्या रक्कमेचे नविन अंदाजपत्रक तयार केले असून तांत्रिक मंजूरीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडे दि.२०.०२.२०१८ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(४) रू.४.२३ कोटी एवढ्या रक्कमेचे अंदाजपत्रक प्रशासकिय मान्यतेसाठी नगरपरिषदेकडून शासनाच्या सांस्कृतिक विभागाकडे सादर करण्यात येईल. सांस्कृतिक कार्य विभागाच्या वर नमूद केलेल्या दि.२७.०८.२००२ च्या शासन निर्णयातील परिच्छेद १ मधील अनुक्रमांक (२) मधील तरतुदीनुसार या नाट्यगृहासाठी रू.३ कोटीपेक्षा जादा खर्च झाल्यास जास्तीचा खर्च नगरपरिषदेने करणे आवश्यक आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उरण (जि.रायगड) तालुक्यातील जेएनपीटीमध्ये सिंगापूर पोर्ट या चौथ्या बंदराची निर्मितीसाठी संपादीत केलेल्या जमीनीचा मोबदला प्रकल्पग्रस्तांना मिळण्याबाबत

**(३१) * १०६१९७ श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण तालुक्यातील (जि.रायगड) जेएनपीटीमध्ये सिंगापूर पोर्ट या चौथ्या बंदराची निर्मिती होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वीच्या जेएनपीटी, डीपी वर्ल्ड आणि जिटीआय या बंदराच्या निर्मितीसाठी ज्या स्थानिक शेतकऱ्यांच्या जमीनी संपादित करण्यात आल्या आहेत त्या प्रकल्पग्रस्तांना अद्याप मोबदला व नोकऱ्यामध्ये सामावून घेण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत सिंगापूर पोर्ट हे भर समुद्रात भराव करुन उभे राहत असल्याने या बंदरामुळे मच्छिमार बांधवाचे उपजीविकेचे एकमेव साधन नष्ट होऊन त्यांच्यावर उपासमारीची वेळ आल्याचे तसेच समुद्राच्या भरतीचे पाणी गावात घुसुन शेतजमीनीचे नुकसान होत असल्याने ग्रामस्थांनी जेएनपीटी प्रशासकीय अधिकारी यांना प्रत्यक्ष भेटून प्रकल्पामुळे विस्थापीत झालेल्या ग्रामस्थांच्या कुटुंबियांना प्रकल्पातील नोक-यात सामावून घेण्याबाबत निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अधिका-यांनी प्रकल्पग्रस्तांना आश्वासने देऊनही या प्रकल्पातील नोकर भरतीमध्ये प्रकल्पग्रस्त व स्थानिकांची भरती न करता ४० परप्रांतीयांची भरती केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) जेएनपीटी बंदराच्या निर्मितीसाठी सन १९८४-१९८५ या कालावधीत उरण तालुक्यातील १२ गाव या स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनी महाराष्ट्र शासनातर्फे संपादित करण्यात आल्या आहेत. सदर जमिनीच्या मोबदल्याची संपूर्ण रक्कम जेएनपीटी प्रशासनाने महाराष्ट्र शासनाकडे अदा केली व महाराष्ट्र शासनाने ती रक्कम प्रकल्पग्रस्तांना अदा केली आहे.

जेएनपीटी बंदरामध्ये एकूण ९०७ प्रकल्पग्रस्त व्यक्तींना प्रत्यक्ष रोजगार दिला आहे. तसेच जीटीआय बंदरामध्ये १६९ प्रकल्पग्रस्त व्यक्तींना व डी.पी.वर्ल्ड/एन.एस.आय.सी.टी. बंदरामध्ये ९० स्थानिक व्यक्तींचा नोकरीमध्ये समावेश करण्यात आलेला आहे. तसेच कंत्राटी कामासाठी जीटीआयमध्ये ७५० व एन.एस.आय.सी.टी./एन.एस.आय.जी.टी. मध्ये ९८५ व जेएनपीटीमध्ये ८४० स्थानिक / प्रकल्पग्रस्त व्यक्तींना सामावून घेतले आहे.
(३) सिंगापूर पोर्ट हे समुद्रात भराव करुन उभे असून जेएनपीटीने CWPRS (Central Water & Power Research Station) या सरकारी मान्यताप्राप्त संस्थेकडून समुद्रात भराव करण्यासंबंधी सर्वेक्षण केलेले होते. त्यांच्या अहवालानुसार समुद्राच्या भरतीचे पाणी गावात घूसून शेतजमिनीचे नुकसान होईल असे आढळलेले नाही. केंद्र सरकारच्या मान्यतेनुसार २००

हेक्टरमध्ये भराव केला आहे. स्थानिक (मच्छिमारांनी) ग्रामस्थांनी अशा प्रकारे निवेदन दिले आहे.तसेच निवेदनानुसार जेएनपीटी प्रशासनाने बैठक घेऊन स्थानिक/प्रकल्पग्रस्तांना जास्तीत जास्त संख्येने नोकरीत सामावून घेण्यासाठी सिंगापूर पोर्ट प्रशासनास सूचित करण्यात आले आहे.

(४) सद्यःस्थितीत सिंगापूर पोर्टने शैक्षणिक पात्रतेनुसार १६५ लोकांना नोकरीमध्ये समाविष्ट केले आहे. त्यापैकी ५२ प्रकल्पग्रस्त आहेत तसेच इतर व्यक्ती या उरण तालुक्यातील स्थानिक कामगार आहेत. या व्यतिरिक्त नोकरभरतीमध्ये प्रशासकीय अधिका-यांचा समावेश आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिका संचालित नायर रुग्णालय येथे एमआरआय विभागात सिलिंडर फुटून झालेली दुर्घटना

**(३२) * १११३८१ ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका संचालित डॉ वा.ल.नायर रुग्णालय येथे एमआरआय विभागात कोणतीही धातूची वस्तू नेऊ नये असा नियम असतांनाही रुग्णाच्या नातेवाईकाला ऑक्सिजन सिलिंडर नेण्यास कुणीही मनाई केली नाही आणि त्यामुळे राजेश मारू (वय ३२) या व्यक्तीचा सिलिंडर फुटून वायू शरीरात गेल्याने दिनांक २८ जानेवारी, २०१८ रोजी मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेडिओलॉजी विभागाच्या बाहेर कोणती काळजी घ्यावी याची माहिती लावणे बंधनकारक असतांना मात्र या निकषांचे कर्मचाऱ्यांकडून उल्लंघन केले जाते तसेच या संदर्भातील सुरक्षिततेकडेही दुर्लक्ष केले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही वेळा सुरक्षारक्षक बंदूक घेऊन अशा विभागात वी.आय.पी. सह प्रवेश करतात तेव्हा चुंबकीय क्षेत्रामुळे बंदुकही खेचली जाते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या गंभीर दुर्घटनेस जबाबदार कर्मचाऱ्यांवर कोणती दंडात्मक व प्रशासकीय कारवाई करण्यात आली व भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी आवश्यक खबरदारी घेण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नायर रुग्णालयाच्या एम.आर.आय. विभागात कोणतीही धातुची वस्तू नेऊ नये असा नियम आहे.

दिनांक २७ जानेवारी, २०१८ रोजी नायर रुग्णालयातील एम.आर.आय. विभागात झालेल्या दुर्घटनेत रुग्णासमवेत असलेले श्री. राजेश मारु यांचा वायु शरीरात गेल्याने मृत्यु झाला ही वस्तुस्थिती आहे.

या संदर्भात रुग्णांच्या नातेवाईकांनी आग्रीपाडा पोलीस स्टेशन येथे नोंदविलेल्या प्रथम खबरी अहवालाच्या अनुषंगाने गु.र. क्रमांक २४/२०१८ दाखल करण्यात आला असून, पोलीसांमार्फत तपास करण्यात येत आहे.

तसेच सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत स्वतंत्र चौकशी करण्यात येत आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इस्पितळातील रेडिओलॉजी विभागाच्या बाहेरील बाजूस कोणती काळजी घ्यावी याची माहिती लावणे बंधनकारक आहे. त्यानुसार आवश्यक सूचना लावण्यात आल्या आहेत. तसेच, खालील आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत :-

• नायर रुग्णालयातील कोणत्याही विभागातील रुग्ण एम.आर.आय. तपास करण्याकरीता एम.आर.आय. विभागात आणतांना प्रवेशव्दाराजवळच रुग्णासोबत आलेल्या नातेवाईकांना प्रवेश देण्यास मज्जाव/ प्रतिबंध करण्यात येतो.

• रुग्ण स्वतः चालत आला असेल तर त्याच्या सोबतच्या नातेवाईकांना एम.आर.आय. विभागाच्या प्रवेशव्दारातून प्रवेश देण्यात येत नाही.

• तथापि रुग्ण ऑक्सिजन ट्रॉलीवर/व्हिल चेअरवर असेल तर आवश्यकतेनुसार केवळ १ ते २ नातेवाईकांना प्रवेशव्दारातून प्रवेश देण्यात येतो.

• एम.आर.आय. विभागात नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना एम.आर.आय. मशीन हाताळतांना तसेच एम.आर.आय. विभागात वावरतांना घ्यावयाच्या दक्षतेबाबत विशेष प्रशिक्षण देण्यात येते.

त्यानुसार एम. आर. आय. विभागामधील सर्व कर्मचाऱ्यांकडून सर्व निकषांचे पालन केले जाते.

(३) एम.आर.आय. विभागातील प्रतिबंधित क्षेत्रात कोणत्याही चुंबकीय धातूला प्रवेश निषेध आहे.

त्यामुळे बंदुकधारी सुरक्षा रक्षकाला एम.आर.आय. विभागातील प्रतिबंधित क्षेत्रात मज्जाव आहे.

(४) व (५) सदर प्रकरणी रुग्णालयाचे २ डॉक्टर्स, १ वॉर्डबॉय, १ आयाबाई यांना अटक करण्यात आली असून, त्यांची जामिनावर मुक्तता करण्यात आली आहे. रुग्णाच्या नातेवाईकांनी आग्रीपाडा पोलीस स्टेशन येथे नोंदविलेल्या प्रथम खबरी अहवालाच्या अनुषंगाने गु. र. क्रमांक २४/२०१८ दाखल करण्यात आला असून, पोलीसांमार्फत तपास करण्यात येत आहे.

तसेच सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत स्वतंत्र चौकशी करण्यात येत आहे.

नायर रुग्णालयाच्या एम.आर.आय. विभागात घ्यावयाची काळजी व एम.आर.आय. सेफ्टीसाठी SOP- (Standard Operating Procedure) रुग्णांकरीता उपलब्ध आहेत. तसेच, एम. आर. आय. च्या कन्सेंट फॉर्मवर रुग्णांकरीता घ्यावयाची काळजी व रुग्णांसाठी निषिध्द असलेल्या साधनांची माहिती दिलेली आहे.

नायर रुग्णालयात अशा दुर्घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरीता एम.आर.आय. विभाग प्रमुखांनी सुचविलेल्या खालील उपाययोजना करण्याचे प्रस्तावित आहे :-

१. एम.आर.आय. विभागात रुग्णासमवेत असलेल्या नातेवाईकांना प्रवेशास मज्जाव/प्रतिबंध करण्याकरीता एम.आर.आय. विभागाच्या प्रवेशव्दाराच्या बाहेरील बाजूस तिन्ही सत्रांत एक सुरक्षारक्षक कायमस्वरुपी तैनात करण्यात येईल.

२. एम.आर.आय. विभागात रुग्णाची एम.आर.आय. तपासणी करतांना आवश्यक स्पेशालिटी मेडिकल ऑफिसर, निवासी वैद्यकीय अधिकारी, तंत्रज्ञ, परिचारिका, वॉर्डबॉय, आयाबाई आणि सुरक्षारक्षक इत्यादी कर्मचारीवर्ग कायमस्वरुपी उपस्थित असणे अत्यंत आवश्यक आहे.

३. एम.आर.आय. विभागात सध्या केवळ १ प्राध्यापक (विभागप्रमुख) व १ सहाय्यक प्राध्यापक अशी दोन पदे कार्यरत असून एम.आर.आय विभागाकरीता सदर दोन पदांव्यतिरिक्त १ सहयोगी प्राध्यापक व १ सहाय्यक प्राध्यापक अशी दोन पदे निर्माण करण्यात यावी व ती कायमस्वरुपी भरण्यात यावी.

४. नायर रुग्णालयातील एम.आय.सी.यु., एस.आय.सी.यु., आय.सी.सी.यु., एन.आय.सी.यु., आय.पी.सी.यु., ट्रॉमा या प्रत्येक अतिदक्षता विभागांकरीता स्वतंत्ररित्या एम.आर.आय. कॉम्पिटेबल ट्रॉली, एम.आर.आय. कॉम्पिटेबल व्हिलचेअर, ऑक्सिजन सिलेंडर, फायर एक्स्टिंग्युशर (Fire Extinguisher) उपलब्ध करुन देणे.

-----------------

## मुंबईतील पवई, सांताक्रुझ आणि मिरा भाईदंर येथे गृहनिर्माण प्रकल्प राबवून ग्राहकांची केलेली फसवणूक

**(३३) * ११०३६०  श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पवई, सांताक्रुझ आणि मिरा भाईंदर येथे गृहनिर्माण प्रकल्प राबवित असल्याचे सांगून २ हजार ५७९ इच्छुक प्लॉट खरेदीदारांकडून सुमारे रुपये ४२५ कोटी घेउुन फसवणूक केल्याप्रकरणी संबंधित विकासकाला अटक करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित विकासकाला अटक करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

नमुद विकासकाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेला अटकपुर्व जामीन अर्ज क्र. १५३३/२०१७, दि. ११.०१.२०१८ रोजी फेटाळला आहे.

(२) आरोपी विकासक दिपेश लक्ष्मण भगतानी यास आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई येथे दाखल गु.र.क्र. ४५/१७ मध्ये दि. ११.०१.२०१८ रोजी अटक करण्यात आली आहे.

(३) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असुन विकासक मे. जेव्हीपीडी प्रॉपर्टीज प्रा.लि. चे संचालक लक्ष्मण भगतानी, मुकेश भगतानी, दिपेश भगतानी यांच्या विरुध्द खालीलप्रमाणे एकूण ५ गुन्हे दाखल आहेतः-

(१) भगतानी सेरेनिटी, पवई येथील गृह प्रकल्पाबाबत आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई येथे गु.र.क्र. ८७/१७, भा.दं. वि. कलम ४०६, ४२०, १२०(ब), ३४ सह कलम ३, ४, ५, ६, ८, १३, १४ मोफा अधिनियम अन्वये गुन्हा.

(२) भगतानी रिओ, मीरा रोड येथील गृह प्रकल्पाबाबत आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई येथे गु.र.क्र. ४५/१७, भा.दं. वि. कलम ४०९, ४२०, १२०(ब), ३४ सह कलम ३, ४, ५, ६, ८, १३, १४ मोफा अधिनियम अन्वये गुन्हा व

(३) गु.र.क्र. १०४/१७, भा.दं. वि. कलम ४२०, ३४ अन्वये गुन्हा.

(४) भगतानी सवाना, कांजुरमार्ग येथील गृह प्रकल्पाबाबत आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई येथे गु.र.क्र. ८९/१७ भा.दं. वि. कलम ४०९, ४२०, १२०(ब), सह कलम ३, ४, ५, ८, १३ मोफा अधिनियम अन्वये गुन्हा.

(५) भगतानी सफायर, दहिसर पुर्व येथील गृह प्रकल्पाबाबत आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई येथे गु.र.क्र. ८६/१७, भा.दं. वि. कलम ४०६, ४२०, १२०(ब), ३४ सह कलम ३, ४, ५, ८, १३ मोफा अधिनियम अन्वये गुन्हा.

सदर विकासकाविरुध्द वरील दाखल गुन्ह्यांच्या तपासाकरिता विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आली असुन नमुद गुन्हे तपासाधीन आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वरळी मुंबईतील सर पोचखानवाला मार्गावरील निवासी इमारती धोकादायक असल्याबाबत

**(३४) * ११२२४१ श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी, (मुंबई) येथील सर पोचखानवाला मार्गावरील सी-४/१, २, ३ आणि सी-५/१, २, ३ या पोलीस वसाहतीतील निवासी इमारतीं या वास्तव्यास अत्यंत धोकादायक असल्याचे शासनाने केलेल्या संरचनात्मक परीक्षणात (स्ट्रक्चरल ऑडीट) निष्पन्न झाले असतानाही सद्यस्थितीत या इमारतींत सुमारे १२० पोलीस कुटुंबीय वास्तव्य करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार इमारतींच्या दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई येथील ३२०/१६० पोलीस वसाहतीतील इमारतींचे सार्वजनिक बांधकाम विभागाने सन २०१३ मध्ये संरचनात्मक लेखा परिक्षण करुन अहवाल दिला आहे. या अहवालाप्रमाणे सी-४/१,२,३ आणि सी-५/१,२,३ ह्या इमारती धोकादायक नाहीत.

तथापि, उक्त अहवालानुसार उक्त इमारतींची बाह्य दुरूस्ती करणे आवश्यक आहे. त्याकरिता रुपये १४,७१,२६,७२६/- इतक्या खर्चाच्या अंदाजास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

सध्या उक्त इमारतींमध्ये ८५ पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे कुटुंब राहतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहर व उपनगराच्या सन २०३४ च्या विकास आराखड्यास मंजूरी मिळण्याबाबत

**(३५) * १०७८०९ ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.अजय चौधरी (शिवडी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने मुंबई शहर व उपनगराचा सन २०३४ पर्यंतचा विकास आराखडा शासनाकडे मंजूरीसाठी पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर विकास आराखड्यास मंजूरी दिली आहे काय,

(३) असल्यास, सदर विकास आराखड्याचे स्वरुप काय आहे, त्यामध्ये कोणकोणत्या मोठ्या प्रकल्पांचा समावेश आहे,

(४) असल्यास, मुंबई शहरातील खासगी इमारतींचा पुनर्विकास होण्यासाठी या नियमावलीवर तातडीने निर्णय होण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अद्याप विकास आराखड्यास शासनाने मंजूरी दिली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने आगामी २० वर्षाचा सुधारित प्रारुप आराखडा २०१४-३४ हा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३० खाली दिनांक ०२.०८.२०१७ रोजी शासनास मंजूरीसाठी सादर केलेला आहे.

(२) ते (५) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१ खालील तरतूदीनुसार ६ महिन्याचा विहित कालावधीमध्ये अथवा त्यानंतर एकंदर २४ महिन्याचा वाढीव कालावधीमध्ये राज्य शासनाने संचालक, नगर रचना यांचेशी सल्लामसलत करुन त्यास मंजूरी देणे अभिप्रेत आहे. सदर आराखडयाची छाननी संचालक, नगर रचना यांचेकडे सुरु आहे. लवकरात लवकर सदर आराखडयास मंजूरी देणेचे शासनाकडून संकल्पित आहे.

----------------

## फैजपूर (ता.यावल, जि.जळगाव) नगरपालिकेतील धाडी नदी संरक्षक भिंतीचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत

**(३६) * १११५९३ श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फैजपूर (ता.यावल, जि.जळगाव) नगरपालिकेत वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत सुरु असलेले २.५० कोटी रुपयांचे धाडी नदी संरक्षक भिंतीचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बांधकामासाठी माती मिश्रित वाळू, निकृष्ट दर्जाचे सिमेंट इ.प्रकारे निकृष्ट काम केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामासंदर्भात नागरिकांनी तक्रारी करूनही नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी सदर कामाकडे दुर्लक्ष केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधित ठेकेदारांवर व अधिकाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) अशा आशयाची तक्रार जिल्हाधिकारी, जळगाव कार्यालयात प्राप्त झाली आहे, हे खरे आहे.

(४) प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने जिल्हाधिकारी, जळगाव यांनी कळविल्याप्रमाणे :-

• शासनाच्या वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत फैजपूर नगरपरिषदेमार्फत धाडी नदीचे सुशोभिकरण करणे (संरक्षण भिंत बांधकाम) हे काम प्रगती पथावर आहे.

• आतापर्यंत पूर्ण केलेल्या कामाचे तांत्रिक लेखापरिक्षण त्रयस्थ संस्थेमार्फत करण्यात आले असून, सदर कामासाठी वापरलेल्या साहित्याचा दर्जा समाधानकारक असून काम अंदाजपत्रकानुसार योग्य असल्याचा अहवाल त्यांनी दिला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील अंजुमन इस्लाम गर्ल्स हायस्कूल शेजारील जीया इमारतीच्या तळ मजल्यावरील अनधिकृत गोदामाला लागलेली आग

**(३७) * १०४९७१ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अंजुमन इस्लाम गर्ल्स हायस्कूलच्या शेजारी असलेल्या जीया ह्या इमारतीच्या पार्किंगसाठी असलेल्या तळघरातील अनधिकृत गोदामांना दिनांक ५ जानेवारी, २०१८ रोजी आग लागून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनधिकृत गोदामामुळे रहिवाशांच्या जीवीताला धोका असल्याची बाब सोसायटीच्या चेअरमननी माहे मार्च, २०१३ पासून मुंबई महानगरपालिकेतील ''ई' वार्डात वारंवार तक्रारी करुनही याप्रकरणी कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले वा त्यानुसार या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या महानगरपालिकेतील अधिकारी तसेच गोदाम धारकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबईतील जीया इमारतीच्या तळघरात दिनांक ०५.०१.२०१८ रोजी लागलेल्या आगीत नुकसान झाले ही वस्तुस्थिती आहे.
(२) जीया इमारतीच्या तळघरातील गोडाऊनमध्ये अनधिकृत कारखाने सुरु असल्याबाबत जीया इमारतीच्या सोसायटीच्या अध्यक्षांनी मार्च, २०१३ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे तक्रार केली होती.

त्यानुषंगाने महानगरपालिकेच्या अनुज्ञापन खात्यामार्फत दिनांक ०६.०४.२०१३ रोजी पाहणी करुन अनधिकृत व्यवसायांबाबत स्थळनिरीक्षण अहवाल देण्यात आला.

सदर स्थळनिरीक्षण अहवालाच्या आधारे गोडाऊनधारकांविरुध्द शिंदेवाडी न्यायालय येथे दिनांक १०.०४.२०१३ रोजी दावे दाखल करण्यात आले आहेत.

सदर प्रकरणी संबंधित ३ व्यक्तींना मा. न्यायालयाने एकूण रु.४५,०००/- इतका दंड ठोठावला आहे.

(३) सदर ठिकाणी असलेल्या अनधिकृत बांधकामावर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निष्कासन कारवाई करण्यात आली असून, नागपाडा पोलीस ठाणे येथे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या कलम ५२ सह ४३ अन्वये दिनांक ०६.०१.२०१८ रोजी तक्रार दाखल करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर महानगरपालिकेच्या परिवहन विभागाने निविदा न काढता इलेक्ट्रॉनिक तिकिट मशीनची नियमबाहृय खरेदी केल्याबाबत

**(३८) * १०७९७१ श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेच्या परिवहन विभागाने निविदा न काढता शहर बस वाहतुकीसाठी १ कोटी ५४ लाख रुपयांच्या ८०० इलेक्ट्रोनिक तिकिट मशीनची (ईटीएम) नियमबाह्य खरेदी केल्याची बाब दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निविदा न काढता परस्पर खरेदी करण्यात आलेल्या इलेक्ट्रोनिक तिकिट मशीन प्रकरणांची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, त्यानूसार शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

परिवहन समिती ठराव दि.२०/१०/२०१६ अन्वये मान्यता प्रदान केल्यानंतर व आवश्यक ती प्रशासकीय मान्यता घेतल्यानंतर, विहीत निविदा प्रक्रियेद्वारे रु.१,५४,१३,६००/- इतक्या रकमेच्या ८०० ईटीएम मशीन खरेदी करण्यात आलेल्या आहेत.

(२) व (३) • या मशीनची किंमत अद्यापपर्यंत सदरहू कंपनीस अदा करण्यात आलेली नाही.

• तथापि, या खरेदीसंदर्भात जानेवारी, २०१८ मध्ये स्थानिक दैनिक वृत्तपत्रात आलेल्या बातम्यांच्या अनुषंगाने, नागपूर महानगरपालिकेच्या सभागृहात उपस्थित प्रश्नांच्या अनुषंगाने, महापौर यांनी चौकशीचे निदेश दिले असून, त्याअनुषंगाने अतिरिक्त आयुक्त, नागपूर मनपा यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी सुरु आहे.

• चौकशी अहवाल अद्याप प्रलंबित आहे.

-----------------

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या कामादरम्यान भूसुरुंगाचा स्फोट होऊन झालेला अपघात

**(३९) * १०९२८४ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर),**

**श्री.जयकुमार गोरे (माण), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन न करता शासनाने विमानतळपूर्व कामांना सुरुवात केल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पाच्या कामामध्ये टेकडी सपाटीकरणासाठी करण्यात आलेल्या भूसुरुंगाच्या स्फोटामुळे सात कर्मचारी जखमी झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंत्राटदाराने निष्काळजीपणे स्फोटके हाताळल्याने सदर अपघात झाला तसेच प्रकल्पस्थळावर रुग्णवाहिका, अग्निशमन दल आणि तत्सम सुरक्षाव्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली नव्हती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या कामांमध्ये भूसुरुंग लावल्याने प्रकल्पग्रस्तांच्या घरांना जोरदार हादरे बसून मालमत्तेची हानी होत असून प्रकल्पग्रस्त राहत असलेल्या परिसरात ध्वनी आणि वायूप्रदूषण होऊन प्रकल्पग्रस्तांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी संबंधित कंत्राटदाराविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पबाधितांचे सुमारे ९०% पुनर्वसन अनुषंगिक कामकाज पूर्ण झाले असून सिडकोच्या ताब्यातील जमिनीवर विमानतळपूर्व कामांना सुरुवात झालेली आहे.

(२), (३), (४) व (५) विमानतळ गाभा क्षेत्रातील उलवे टेकडीच्या सपाटीकरण कामावर नियंत्रण व देखरेख ठेवण्यासाठी केंद्र शासनाच्या अखत्यारीतील केंद्रिय खणन आणि अनुसंधान संस्था, धनबाद, या संस्थेची तांत्रिक सल्लागार म्हणून नियुक्ती केली असून त्यांच्या सल्ल्यानुसार आवश्यक त्या

सुरक्षा बाबींची खातरजमा तसेच जमिनीचे कंपन आणि ध्वनी यांचे मोजमाप करुनच कंट्रोल ब्लास्टिंग करण्यात येते.

दि.६/१/२०१८ रोजी पॅकेज-४ अंतर्गत सिध्दार्थ नगर जवळ उलवे टेकडीवरुन दगड घसरुन झालेल्या अपघाताबाबत संबंधित ठेकेदाराने दिलेल्या अहवालाची चौकशी करुन अहवाल सादर करण्याविषयी तांत्रिक सल्लागार संस्थेस सिडकोमार्फत कळविण्यात आले आहे.

दरम्यान ब्लास्टिंगचा परिसरातील गावांना व नागरीकांना कोणताही धोका होवू नये, यासाठी सर्वतोपरी खबरदारी घेण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई येथील पश्चिम द्रुतगती महामार्गावरील समता नगर येथे मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाल्याबाबत

**(४०) * १०५०९२ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पश्चिम द्रुतगती महामार्गावरील समता नगर पोलीस ठाणे तसेच स्पोर्ट्स ऑथोरिटी ऑफ इंडियाच्या मागील बाजूस महामार्गाला लागून असणाऱ्या पोहोच रत्यावर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या बाजूला व्यवसायीकांनी अतिक्रमण केले असून या अनधिकृत अतिक्रमणाबाबत वारंवार तक्रारी व पत्रव्यवहार करून देखील संबंधितांकडून कोणत्याही प्रकारची कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार अतिक्रमण निष्कासित करून त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबईतील पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या पोहोच रस्त्याच्या बाजूला असलेल्या मोकळया भूखंडावर अतिक्रमण होत असल्याचे निदर्शनास आले आहे ही वस्तुस्थिती आहे.

(२), (३), (४) व (५) सदर अतिक्रमणात रोपवाटीका, मातीची भांडी, मातीचे पुतळे व काही कच्च्या झोपड्या यांचा समावेश आहे.

सदर अतिक्रमणांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक १५.१२.२०१६, २२.१२.२०१६, १३.०६.२०१७, ११.०१.२०१८ रोजी निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.

सदर जागेवरील दोन झोपडीधारकांनी मा. दिंडोशी न्यायालयात दाखल केलेल्या सुट क्रमांक ०१/२०१७ मध्ये, मा. न्यायालयाने महानगरपालिकेला कारवाई करण्यासाठी प्रतिबंध केला असून, सदर प्रकरणी मा.न्यायालयाने "कोर्ट कमिशनर" यांची नियुक्ती केलेली आहे.

सदर प्रकरणी मा.न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे.

-----------------

## मुंबईतील जोगेश्वरी (पूर्व) येथील सर्वोदय नगर मधील प्राथमिक शाळेत पोषण आहारातील खिचडी खाल्याने अनेक विद्यार्थ्यांना झालेली विषबाधा

**(४१) * १०६८०७ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी पूर्व (मुंबई) येथील सर्वोदय नगर मधील महानगरपालिकेच्या बालविकास विद्या मंदिर प्राथमिक शाळेत पोषण आहारातील खिचडी खाल्याने अनेक विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याने या परिसरातील कोकण रुग्णालयात तातडीने दाखल करुन पोषण आहार पुरविणाऱ्या ठेकेदारा विरोधात मेघवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आल्याची बाब दिनांक १३ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खिचडीचे नमूने शाळा प्रशासनाने तपासण्याकरीता कोणत्या प्रयोग शाळेत पाठविले होते व प्रयोग शाळेकडून त्याबाबतचा अहवाल शाळा व शिक्षण मंडळास प्राप्त झाला आहे काय,
(३) असल्यास, सदर शाळेतील मुलांना कोणत्या कारणामुळे विषबाधा झाली याची कारणे त्या अहवालात नमूद करण्यात आली आहेत काय,
(४) असल्यास, आहार पुरवठा करणाऱ्या संस्थेकडून दुषित अन्न पुरवठा करण्यात आला असल्यास, त्या संबंधितांवर शासनामार्फत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) जोगेश्वरी (पूर्व) सर्वोदय नगरमधील बालविकास विद्या मंदिर प्राथमिक व माध्यमिक शाळेतील ४० विद्यार्थ्यांना दिनांक १३.१२.२०१७ रोजी खिचडी खाल्ल्यामुळे उलटी व मळमळ सारखा त्रास झाल्यामुळे उपचारासाठी नजीकच्या कोकण व ट्रामा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते.

तद्नंतर, सदर शाळेने आहार वितरण करणाऱ्या चाफाई महिला सेवा सहकारी संस्था मर्यादित यांचेविरोधात मेघवाडी पोलीस ठाणे येथे दिनांक १३.१२.२०१७ रोजी तक्रार दाखल केली होती.

त्यानुषंगाने सदर संस्थेविरुध्द दिनांक १४.१२.२०१७ रोजी मेघवाडी पोलीस स्टेशन येथे गु.र.क्रमांक ३१२/२०१७ कलम २७३,३३६ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदर दिवशीच्या आहाराचा नमुना महानगरपालिकेच्या प्रयोगशाळेमध्ये पाठविला होता.

तसेच, मेघवाडी पोलीस स्टेशन आणि अन्न व औषध प्रशासन यांनी सदर शाळेतून आहाराचा नमुना तपासणीसाठी घेतला होता.

बृहन्मुंबई महानगरपालिका प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाला असून, त्यातील जीवाणूजन्य विश्लेषण अहवालानुसार, विषबाधेस कारणीभूत होणारे पॅथोजेन्स ई-कोलाय, सालमोनेला आणि विब्रिओ कॉलरी हे दिलेल्या अन्न नमुन्यामध्ये आढळून आलेले नाहीत.

तसेच, रासायनिक विश्लेषण अहवालानुसार, मध्यान्ह भोजनाचा नमुना (मटकी भात) हा मानवी अन्नग्रहणाच्या दृष्टीने सुरक्षित असल्याचे आढळून आल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

सदर प्रकरणी अन्न व औषध प्रशासन यांचेकडून प्राप्त अहवालानुसार, खिचडी, मटकी, खाद्यतेल व कच्चा तांदूळ या या खाद्यपदार्थांचा नमुना अन्न सुरक्षा मानके (अन्नपदार्थ मानके व अन्न मिश्रित पदार्थ) नियमन २०११ मधील मानकानुसार प्रमाणित आहे.

संबंधित पोलीस स्टेशन यांनी तपासणीसाठी घेतलेल्या आहार नमुन्याचा अहवाल बृहन्मुंबई महानगरपालिकेस अद्यापि अप्राप्त आहे.

(४) सदर शाळेस आहार पुरवठा करणाऱ्या चाफाई महिला सेवा सहकारी संस्था मर्यादित या संस्थेमार्फत खाजगी अनुदानित शाळांमध्ये करण्यात येणारा आहार पुरवठा बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक १४.१२.२०१७ पासून बंद करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मुख्य शहरांत “गेम किंग इंडिया” या नावाने कोणतीही परवानगी न घेता ऑनलाईन सट्टा सुरु असल्याबाबत

**(४२) * १०६४०४ श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुख्य शहरांत “गेम किंग इंडिया” या नावाने कोणतीही परवानगी न घेता ऑनलाईन सट्टा चालवून शासनाची व नागरीकांची कोट्यवधी रुपयाची फसवणूक करण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस यंत्रणेला तसेच सायबर शाखेला उपरोक्त ऑनलाईन सट्ट्या बाबतची पूर्णपणे माहिती असतांनासुध्दा त्यांच्याकडून कोणतीही कारवाई करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सट्टा चालविणा-या चौरसिया या व्यक्तीस तात्काळ अटक करुन शासनाच्या सक्षम यंत्रणेमार्फत चौकशी करण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार बेकायदेशीरपणे चालू असलेल्या या ऑनलाईन सट्ट्यास मदत करणाऱ्या पोलीस यंत्रणेविरुध्द व सदर सट्टा चालविणाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) राज्यात मुंबई वगळता इतर शहरात गेम किंग इंडिया या नावाने कोणतीही परवानगी न घेता ऑनलाईन सट्टा चालवून शासनाची व नागरिकांची दररोज कोटयावधीची फसवणूक करण्यात येत असल्याची बाब उघडकीस आलेली नाही. तथापि, गेम किंग इंडिया या नावाने ऑनलाईन सट्टयाबाबत बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये एकूण ०४ गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) यासंदर्भात जे.जे.मार्ग पोलीस ठाणे व नागपाडा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून, अचल चौरसिया हा सदर गुन्हयातील एक आरोपी असून त्याचा शोध घेऊन अटक करुन कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) तालुक्यात दुषित पाणी पुरवठा होत असल्याबाबत

**(४३) * ११२२०४ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील नवीन पनवेल, खांदा कॉलोनी, कामोठे, कळंबोली, खारघर तसेच तळोजा या सिडको नोडमधील परिसरात मागील अनेक महिन्यांपासून दुषित पाणी पुरवठा होत असल्याने मोठया प्रमाणात कावीळीचे रूग्ण आढळून आले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित आरोग्य विभाग व पाणी पुरवठा विभागाने वेळीच उपाययोजना न केल्यामुळे कावीळ रोग्याच्या संख्येत वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून वेळीच उपायायोजना न केल्यामुळे कावीळ रोग आटोक्यात आणण्यास अपयशी ठरलेल्या संबंधित विभागाच्या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नाही.

सिडकोच्या मुख्य जलवाहिनी वरील पाण्याच्या नमुन्याची तपासणी करण्यात आली असून महाराष्ट्र राज्य सार्वजनिक आरोग्य सेवा, कोकण भवन यांच्या अहवालामध्ये कोलीफार्म, थर्मोटॉलरंट, इ.कॉलॉय सुक्ष्मजंतूंचे शून्य प्रमाण असल्याचे व सदर पाणी पिण्यायोग्य असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

तसेच सिडकोच्या मुख्य जलवहिनीतून गृहनिर्माण संस्थांच्या नळजोडणीपर्यंत पाणीपुरवठ्याचे वितरण करण्यात येते, सदर नळजोडणी पासून गृहनिर्माण संस्थांना पाणी पुरवठा करणाऱ्या अंतर्गत जलवाहिन्यांची जबाबदारी ही संबंधीत गृहनिर्माण संस्था/इमारतधारकांची असते.

पनवेल नोडमधील काही गृहनिर्माण संस्थेच्या अंतर्गत जलवाहिन्या गंजलेल्या व जिर्ण झालेल्या असल्याने त्या संस्थांना दुषित पाणी पुरवठा होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. परंतु सदरहू जलवाहिन्या बदल्यानंतर उक्त तक्रारींचे निवारण झाले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्हयातील उरण जेएनपीटी बंदरात होत असलेल्या तस्करीबाबत

**(४४) * १०८५८४ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) तालुक्यातील जेएनपीटी बंदरात दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास जीडीएल नावाच्या गोदामात ५० किलो वजनाचे सोने व दिनांक ३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास ग्लोबिकॉन नामक गोदामात १५ किलो सोने महसूल गुप्तचर संचलनालय यांनी धाड टाकून हस्तगत केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उरण जेएनपीटी बंदरामध्ये याआधीही रक्तचंदन, रिव्हॉलव्हर, नशेची पावडर अशा अनेक वस्तुंची तस्करी होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बंदरात स्कॅनिंग मशिनची संख्याही कमी प्रमाणात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर बंदरातून होत असलेली तस्करी थांबविण्यासाठी शासनाकडून कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) महसुल गुप्तचर संचालनालय ही केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील यंत्रणा आहे. सदर यंत्रणेकडील कामकाजावर राज्य शासनाचे नियंत्रण नाही.

तथापि, महसुल गुप्तचर संचालनालयाने माहे डिसेंबर २०१७ व जानेवारी २०१८ मध्ये जे.एन.पी.टी. बंदरात ५७ किलो सोने जप्त केले असल्याचे कळविले आहे.

(३) व (४) सदरची बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीतील सीमा शुल्क विभागाशी संबंधित आहे. तथापि, बंदरातील प्रतिबंधित उपाययोजनांचे काम

केंद्र सरकारच्या अधिपत्याखालील मुख्य गुप्तचर शाखा, विशेष तपास गुप्तचर शाखा (आयात), विशेष तपास गुप्तचर शाखा (निर्यात) यांच्यामार्फत मालाची तपासणी इत्यादी बाबी राबविल्या जातात.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई प्रकल्पग्रस्त महिला मंडळांना भूखंडाचे वाटप नाममात्र दराने करण्याबाबत

**(४५) * १११९२७ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई प्रकल्पग्रस्त महिला मंडळांना १२.५ टक्के योजनेंतर्गत राखीव असलेल्या भूखंडाचे वाटप नाममात्र दराने करण्याचे सिडकोचे धोरण असूनही अद्‍याप भूखंडाचे वाटप करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिवा गावातील अहिल्या महिला मंडळ व नावसायी महिला मंडळ तसेच ऐरोली गावातील गावदेवी महिला मंडळ या प्रकल्पग्रस्त महिला मंडळांनी त्यांना १२.५ टक्के योजनेंतर्गत नाममात्रदराने राखीव भूखंडाचे वाटप करावे याकरिता सिडको प्राधिकरणाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त महिला मंडळांना राखीव भूखंडाचे वाटप करण्याबाबत शासन स्तरावरून काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांच्या नोंदणीकृत संस्थांना धार्मिक, सामाजिक उपक्रमाकरिता आरक्षित असलेले भूखंड जाहिरातीद्‍वारे पात्र संस्थेस वाटप करण्याबाबत असलेल्या धोरणानुसार सिडको महामंडळाने विविध नोडमध्ये प्रकल्पग्रस्तांच्या ६ संस्थांना महिला मंडळासाठी भूखंड वाटप केले आहे.

(२) याबाबत सिडकोकडे निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## उरण (जि.रायगड) येथे सेझच्या प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनी विनावापर पडून असल्याबाबत

**(४६) * १०४९८६ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) परिसरातील नवी मुंबई सेझ प्रकल्पासाठी संपादित केलेली २१५० हेक्टर जमीन मागील १२ वर्षे विनावार पडून आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिनी सर्व प्रकारच्या उद्योगांना खुल्या करण्यास हरकत नसल्याचा अभिप्राय देऊन सिडकोने दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत याबाबतचा ठराव मंजूर करुन तो अंतिम मान्यतेसाठी शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) असल्यास, सिडको संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरूप काय आहे व सदर निर्णयास शासनाची मान्यता मिळाली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) नवी मुंबईच्या द्रोणागिरी, उलवे व कंळबोली प्रभागांमधील २१४० हेक्टर क्षेत्रापैकी १८४२ हेक्टर क्षेत्र विकसीत करण्यासाठी नवी मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र (NMSEZ) कंपनीला भाडेपट्याने हस्तांतरीत करण्यात आले आहे. सदर ठिकाणी कंपनीने संरक्षक भिंतीचे

बांधकाम, बाह्य पाणीपुरवठा व उलवे पश्चिम येथे दोन इमारतीचे बांधकाम तसेच काही पायाभूत सुविधा उपलब्ध केलेल्या आहेत.

तथापि, सिडको महामंडळाने दि.२९/१२/२०१७ रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीतील ठरावाप्रमाणे 'विशेष आर्थिक क्षेत्र' ऐवजी 'एकात्मिक औद्योगिक क्षेत्र विकसीत' करणेसाठी तत्वत: मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. सदर प्रस्तावानुषंगाने दिनांक ३०/०१/२०१८ रोजी संपन्न झालेल्या मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीत, महाराष्ट्राचे औद्योगिक धोरण-२०१३ मधील तरतूदींच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र प्रकल्प "एकात्मिक औद्योगिक क्षेत्र" म्हणून विकसीत करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.